# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | : | ३८ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ६६**

MAHMARI 19358/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष तिसरे / अंक ३ / फेब्रुवारी २००३

## संपादकीय

### माजी विद्यार्थी

कोणत्याही शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी हे त्या विशिष्ट संस्थेचे वैभव असते, संचित असते. आपल्या व्यक्ती जीवनातील ज्या काळाला सुवर्णकाळ म्हणता येईल, असा महत्त्वाचा, जडणघडणीचा काळ या संस्थेच्या सहवासात, छायेत गेला. त्या काळाने आपल्या जीवनविषयक जाणीवा समृद्ध केल्या, आपल्या आयुष्याला दिशा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला याबद्दल विद्यार्थ्यांच्याही मनात आपल्या शाळा-महाविद्यालयाबद्दल अतिशय ममत्वाची भावना असते. प्रत्येक संवेदनशील सुशिक्षितास आपल्या शाळा-कॉलेजसाठी काहीतरी करावं ही आंतरिक ओढ असते. पण काय करायचं ते स्पष्ट नसतं. त्यासाठीच माजी विद्यार्थी संघाचे व्यासपीठ अतिशय उपयुक्त असते.

आमच्या संस्थेच्या घटक संस्थांमधून माजी विद्यार्थ्यांना सामायिक व्यासपीठावर आणून त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा महाविद्यालयास काही उपयोग करून घेण्याचे सुरू झालेले प्रयत्न वरील पार्श्वभूमीवर महत्त्वाचे वाटतात. आज अतिशय मानाची पदे, जबाबदारीची पदे सांभाळणारे आमचे विद्यार्थी महाविद्यालयात येताच 'आपल्या घरात आलो' या प्रेमाने वागतात. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या 'अनुबंध' विद्यार्थी संघटनेची सदस्यत्व नोंदणी चालू आहे. या सदस्यांच्या 'महाविद्यालयासाठी काय करू इच्छित आहात' व 'महाविद्यालयाबद्दलच्या भावना' या त्यांच्या अर्जावरील मनोगतांचे वाचन केले, तर त्यांच्या मनातील प्रेम सहज अभिव्यक्त होते.

विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्थातून बाहेर पडलेले विद्यार्थी जगभर विखुरले आहेत. या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संपर्कात रहावं, असं आम्हाला नेहमी वाटतं. 'दिशा'सारखं उत्तम व्यासपीठ त्यांना उपलब्ध आहे. या व्यासपीठावरून आपले अनुभवसिद्ध विचार, चिंतन आजच्या विद्यार्थ्यांपर्यंत ते पोहचवू शकतील. याशिवाय आपल्या संबंधित महाविद्यालयाचे, शाळांचे प्रमुख, अधिकारी यांच्या संपर्कात राहून महाविद्यालयांना मदतीचा हात द्यावा. पैसा तर हवा असतोच, त्याचबरोबर निकोप विचारांचे कार्यकर्तेही हवे असतात.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाची 'अनुबंध' ही संघटना, कला-वाणिज्य महाविद्यालयाची 'सर्ज' ही संघटना, तंत्रनिकेतनाची संघटना. याबरोबरच विद्यार्थी आमच्या वेबसाईटवर जाऊन संपर्कात राहू शकतील. आमचा पत्ता असा आहे - http://www.vpmthane.org या साईटवरही माजी विद्यार्थ्यांच्या नोंदणीचा अर्ज उपलब्ध आहे. शिवाय या साईटवरील लिंक्स वापरून तुम्ही आपल्या स्वत:च्या महाविद्यालयाच्या संपर्कात राहू शकता. 'दिशा'तर्फे आमच्या सर्व माजी विद्यार्थी वर्गास आवाहन आहे की आपण संपर्कात रहा, मदतीचे हात पुढे येऊ द्या, आमच्या शिक्षण संस्था महाराष्ट्रातच नाही तर देशात अग्रगण्य ठरू शकतील.

तुमच्या कॉलेज लाईफच्या आठवणी मनात घेऊन कोणत्याही विधायक योजना घेऊन तुम्ही पुढे आलात तर तुमचं स्वागतच आहे!




वर्ष तिसरे / अंक ३ / फेब्रुवारी २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टर्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | जागतीकीकरण !! छे छे ! हे तर आर्थिक आक्रमण | श्री मंदार मकरन्द मुळ्ये | ३ |
| २) | जय जय रघुवीर समर्थ | श्री. शंकर बा. मठ | ६ |
| ३) | मानवी साम्राज्यात प्राण्यांचे शोषण | श्री. प्रभाकर द. अरदकर | १२ |
| ४) | Statistics - एक दिशा | प्रीती पाटील<br>प्राजक्ता नारखेडे<br>पूजा पाटील<br>प्राजक्ता लावंड | १५ |
| ५) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय ११ वा) ॥ विश्वरुप दर्शन योग: ॥ | श्रीमती आशा भिडे | १९ |
| ६) | भागवद्‌गीता - थोडक्यात | सौ. वैशाली फाटक | २७ |
| ७) | शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता | प्रा. विद्याधर वालावलकर | ३० |
| ८) | चिटीन : कचऱ्यापासून कल्पवृक्ष | श्री. वरद रविंद्र प्रधान | ३४ |
| ९) | ॥ इये (अ) मराठीचिये नगरी ॥ | श्री. अमेय रानडे | ३५ |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३७ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# जागतीकीकरण !! छे छे ! हे तर आर्थिक आक्रमण

*आर्थिक आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय अर्थकारणाचा विचार मांडून स्वदेशीचा आग्रह व्यक्त करणारा हा लेख आहे. श्री. मुळ्ये हे आमच्या मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालय शास्त्राच्या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आहेत. - संपादक*

भारत नाव उच्चारताच अभिमानाने मान उंच होते. अभिमान बाळगावा व इतरांनी खरोखर हेवा करावा अशी ही आमची प्रिय मातृभूमी आहे. कोण्या एका हिंदी चित्रपटांत गाणे आहे नां, 'सारे जगमें कहीं न देखा दूसरा हिन्दुस्तान' या पंक्ती ज्याने लिहिल्या आहेत तो धन्यच. या भूमीचा, त्याच्या संस्कृतीचा विकास होण्यासाठी अनेकांनी आपापल्या परीने रक्त आटवले आहे. परंतु हा सारा विकास देशाच्या आर्थिक विकासावरच अवलंबून असतो. हे इंग्रजी राजवटीने आम्हाला दाखवून दिले आहे. एक काळ असा होता की, ज्यांच्या हाती शस्त्र तो राजा, पण आजची परिस्थिती वर्णायची तर असे म्हणता येईल की ज्याच्या हाती बाजारपेठ, तो सम्राट.

आमचा देश सुमारे १५० वर्षे गुलामीत होता व त्या काळात त्याचे अनेक प्रकारे शोषण (Exploitation) करण्यात आले. परिणामी एकेकाळी वैभवसंपन्न असणारी ही भूमी आज परावलंबी बनली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भविष्य काळाची ओळख पटल्यामुळे थोर अर्थपंडित व तत्कालीन वित्तमंत्री डॉ. चिंतामणराव देशमुखांनी भारतीय अर्थकरणाचा समाजाभिमुख पाया घातला. परंतु दुर्दैवाने ती इमारत पूर्ण होण्या अगोदरच चिंतामणरावांना वित्तमंत्रालय सोडावे लागले.

पुढील काळात भारतीय अर्थव्यवस्थेने अनेक क्षेत्रांत भरारी मारली खरी, मात्र त्याचवेळी सरकारचे वाढणारे खर्च, त्यासाठी सतत घेतले जाणारे परकीय कर्ज व त्या कर्जाची परतफेड करण्याकरिता पुन्हा कर्ज ही भेडसावणारी समस्या उत्तरोत्तर वाढत गेली.

या समस्येवर उपाय म्हणून सरकारी महसूल वाढण्यासाठी तत्कालिन केंद्र सरकारने महसुलावर जास्त लक्ष केंद्रित केले. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष यांच्यात समतोल राखणे ही तारेवरची कसरत आमचे अनेक अर्थतज्ज्ञ करीत होते. आणिबाणी नंतरच्या निवडणुका जनता राजवट व जनता पक्षाचे पतन व पुन्हा निवडणुका या साऱ्यांचा परिणाम सरकारी तिजोरीवर होत होता व त्यातच भर म्हणून की काय आमच्या एका पंतप्रधानाची हत्या याच कालावधीत घडून आली.

त्यानंतर सत्तारुढ झालेल्या शासनाने त्यावेळचे पंतप्रधान कै. श्री. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या अर्थव्यवस्थेचे नूतनीकरण सुरू केले. तत्कालिन केन्द्रीय अर्थमंत्री श्री. विश्वनाथ प्रताप सिंग यांनी १९८६ चे अंदाजपत्रक लोकसभेत सादर करताना एक नवी योजना आखून आयातीसाठी असणाऱ्या अनेक अटी कमी केल्या. नवे कर धोरण (Tax Policy or L.T.F.P.) आखून प्रत्यक्ष कर (Direct Taxes) व त्यातून सरकारी महसूलाचे प्रमाण वाढावे या हेतून MODVAT (Modified Value Added Taxation) देशात लागू केले. याचा परिणाम देशात वस्तूंचे उत्पादन मूल्य वाढण्यात झाला.

पुढे बोफोर्स प्रकरण उजेडात येऊन राजीवजींच्या सिंहासनालाच सुरुंग लागला व माजी वित्तमंत्री व्ही.पी. सिंगाच्या बाजूने जनतेने कौल दिला. त्याच्यापुढे देशातील राजकीय घटनांचे वर्णन करणे नलगे.

पुढे राजीव गांधीजींची दुर्दैवी हत्या बघणे या देशाच्या नशीबी आले आणि १९९१ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जनतेने पुन्हा कॉंग्रेस पक्षास निसटते यश देऊन सत्तास्थानी पाठवले. ज्येष्ठतेनुसार श्री. पी. व्ही. नरसिंह राव पंतप्रधान झाले.

१९९१ साल हे कायम लक्षात राहण्यासारखे आहे. आमच्या देशाची आर्थिक स्थिती वर्णनापलीकडे दयनीय होती. घटलेली निर्यात व वाढलेली आयात, सार्वजनिक क्षेत्राती असमर्थता, परकीय चलनांची कमी व वानवा, घसरते जीवनमूल्य, किंमतीमध्ये अती प्रमाणात वाढ इ. समस्या भेडसावीत होत्या. व त्यातही सर्वात जास्त चिंता होती भारतीय चलनाची परकीय मुद्रा बाजारात सतत घटणारी किंमत व त्यासाठी गहाण टाकलेले सोने पुन्हा सोडवून आणणे.

या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ व तत्कालिन केंद्रिय वित्तमंत्री मनमोहन सिंग यांना तत्कालिन पंतप्रधान नरसिंह राव यांच्या सहाय्याने अर्थव्यवस्थेचे नूतनीकरण व अत्याधुनिकीकरण करण्याचे ठरवून नवे आर्थिक धोरण (New Economic Policy) आखले, ते असे :

१) उत्पादनात कायमता राखणे.
२) सरकारचे कर्ज कमी करणे.
३) सार्वजनिक क्षेत्रांतील सरकारी वर्चस्व कमी करून खाजगीकरणांद्वारे विकास घडवून आणणे.
४) मक्तेदारी पद्धत बरखास्त करणे.
५) परदेशी थेट गुंतवणुकीस मंजुरी देणे.
६) बाजारपेठ खुली करणे.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जुनी पारंपरिक चाकोरी सोडून आमच्या देशाने जागतिकीकरणाची वाट धरली. हे भारतीय अर्थव्यवस्थेने घेतलेले नवे, निराळे व ऐतिहासिक वळण होते. भारतात लायसन्स सिस्टिम लागू झाली.

आयात शुल्क कमी करण्यात आले व बाजारपेठ खुली झाली, याचा परिणाम परकीय वस्तू भारतात मुक्तपणे प्रवेश करू लागल्या. फक्त १८ मूलभूत उद्योग आपल्या अखत्यारीत ठेऊन उर्वरित उद्योगांचे खाजगीकरण सुरू झाले. याचा परिणाम कामगार वर्गावर झाला. अनेक कारखान्यांत संप होऊन त्यांना टाळे लागले.

याच धोरणाने मक्तेदारी रद्बातल करणारा फायदा (MRTPA) अस्तित्वात आला. अनेक क्षेत्रात आघाडीवर असणारे भारतीय उद्योग या कायद्याचे बळी ठरले. उदा. मोटार क्षेत्रातील प्रिमिअर पद्मिनी, औषधे व औषध उत्पादन क्षेत्रांतील उद्योग, ग्राहक उपयोगी वस्तूंचे कारखाने इ. याच कायद्याने परकीय उद्योजक त्यांच्या देशात उपयोगी नसणाऱ्या व विकल्या न जाणाऱ्या अनेक वस्तू भारतीय खुल्या बाजारपेठेत कमी किंमतीत सहज विकू लागले आणि भारतीय बनावटीच्या वस्तू उत्तम दर्जा असूनही बाजारपेठेतून हद्पार होऊ लागल्या.

या धोरणाने आयात शुल्कावरील निर्बंध कमी केल्याने उत्पादन शुल्क, कस्टम शुल्क यामध्ये घट होऊन महसूलास त्याची झळ बसू लागली. याचा परिणाम भारतीय वस्तू भारताच्या बाजारात अवाढव्य किंमती घेऊ लागल्या व परिणामी त्यांना आपले स्थान गमवावे लागले.

या धोरणामुळे थेट व मुक्त परकीय गुंतवणुकीस मान्यता मिळाल्याने सुमारे ५१% परकीय गुंतवणूक भारतात झाली. परंतु त्याच बरोबर अनेक भारतीय उद्योग, परकीय बहुराष्ट्रीय कंपन्या विकत घेऊ लागले. भारतीय उद्योग मात्र भांडवलाच्या आभावाने या वाहत्या प्रवाहाबरोबर वाहून गेले.

आज अनेक क्षेत्रात परकीय गुंतवणूक वाढल्यामुळे भारतीयांचे शोषण फार मोठ्या प्रमाणात होऊ लागले. भारतातील बेकारी, गरिबी, मरगळ दूर होऊन भारत स्वावलंबी, वैभवसंपन्न व विकसीत व्हावा, हा मुख्य हेतू डोळ्यासमोर ठेवून हे धोरण आखण्यात आले होते, हे धोरण यशस्वी व्हावे म्हणून उत्तम प्रशासकांची नियुक्तीही करण्यात आली.

परंतु प्रशासकांची अकार्यक्षमता, शासन टिकवण्यासाठी शासन व प्रशासन यंत्रणेत होणाऱ्या अंतर्गत बेहिशेबी घडामोडी व सतत वाढणारा भ्रष्टाचार ही या नव्या धोरणाद्वारे देशांत पसरू लागला. आपले आसन कायम राखण्यासाठी सुरू झालेली चढाओढ उत्तरोत्तर वाढत

राहिली. काही वेळा तर आसनासाठी 'ब्रीफकेस लॉबी' चाही मार्ग आचरण्यात आला.

देशांत अनेक समस्या निर्माण होत असताना, अनेक परकीय शक्तींकडून भारताच्या अनेक भागात अतिरेकी कारवाया होत असताना देशाचे अर्थकारणही भ्रष्टाचाराच्या अतिक्रमणाने पोखरले जात होते. ते अगदी खालच्या पातळीपर्यंत जाऊन पोहोचले.

हे धोरण देशात लागू झाल्यावर उज्वल व संपन्न भारताचे चित्र प्रसार माध्यमांद्वारे पावलोपावली रंगवण्यात येऊ लागले. परंतु आज एका दशकानंतर मागे वळून बघताना असे राहून राहून वाटते की जागतिकीकरण या गोड गोंडस नावाखाली आम्ही अंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF), जागतिक बँक (IBRD) व विश्व व्यापार संघटनेच्या (W.T.O.) आर्थिक गुलामगिरीकडे नकळत भरकटत गेलो.

आजचे परकीय कर्ज पाहिल्यास असे म्हणावे लागते की, १९९१ नंतर भारतात जन्म घेणारे प्रत्येक नवजात अर्भक सुमारे तीन हजार कोटींचे ओझे आपल्या डोक्यावर घेऊनच जन्मते.

आमच्या देशात असणारी संसदीय लोकशाही ही चिरकाल व आदर्श लोकशाही म्हणून प्रसिद्ध आहे. १९७५ ते १९७७ हा आणिबाणीचा कालखंड सोडल्यास देशातील लोकशाही आज या क्षणापर्यंत टिकून आहे. या लोकशाहीतील राजे म्हणजे खेड्यांतून, वस्त्या वस्त्यांतून रहाणारी गरीब जनता. या रस्त्यावरील जनता जनार्दनाची सेवा कशी करावी, याचे निर्णय राजधानीतल्या संसद भवनाच्या आलिशान, वातानुकुलीन कक्षात घेतले जातात हे कटु सत्य आहे.

आज विद्यापीठांतून लाखो विद्यार्थी पदव्या घेऊन बाहेर पडत आहेत. त्यांच्या अंगी असणारे गुण धसास लागण्यासाठी त्यांना सेवा करण्याची संधी देणे आवश्यक आहे. परंतु असणारे उद्योग, सार्वजनिक उपक्रमच जर बंद होणार असतील तर या देशातील बेकारी कमी होणार कशी? बेकारी हीच या देशातील अनेक समस्यांचे मूळ ठरली आहे. हातांना काम मिळाले नाही तर देशातील विद्यापीठे ही बेकारांचे उत्पादन करणारी फॅक्टरीज ठरतील.

१९९१ ची परिस्थिती आज राहिलेली नाहीत. यावेळी आम्ही स्वीकारलेले जागतिकीकरण हे आमच्या देशावर आर्थिक आक्रमण ठरले आहे. ही परिस्थिती टाळणे हाच पर्याय आता योग्य आहे. परदेशी भक्ती योगापेक्षा भारतीय वस्तूंचा कर्मयोगच आम्ही आचारला पाहिजे. मुक्ततेचे दुष्परिणाम आज अमेरिकेसारखे संपन्न व गर्भश्रीमंत राष्ट्रही भोगत आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजेच अमेरिकेला झालेली जाणीव व स्वावलंबी होण्यासाठी त्याची चालू असणारी धडपड.

अजूनही वेळ गेली नाही. आमच्या लोकप्रतिनिधींनी, अर्थ शास्त्रज्ञानी प्रात्यक्षिक आढावा घेऊनच योग्य ती पावले उचलली पाहिजेत. आर्थिक आक्रमणांतून तरून जाऊन उद्याच्या संपन्न व विश्वविजयी भारतासाठी 'पुनश्च हरी ॐ' म्हणून भारतीयकरणाकडे वाटचाल करणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक नागरिकाने भारतीय होणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येकाने संकल्प करायला हवा, भारतीय वस्तू वापरू या, भारतीय बनूया व उद्याचा संपन्न भारत या आचरणातून घडवूया.

**आधार / संदर्भ :-**

१. जागतिकीकरण आणि भारत - सौ. नलिनी पंडित

२. आर्थिक आक्रमणाचे चक्रव्यूह आणि स्वदेशी - द. बा. ठेंगडी

३. साप्ताहिक विवेक - मुंबई

४. इतर मासिकातील अर्थविषयक लेख

**मंदार मकरन्द मुळये**
११/७१, 'सर्वेश', ब्राह्मण आळी,
सहयोग सोसायटी मागे,
नेरळ - ४१०१०१, जि. रायगड.

# जय जय रघुवीर समर्थ

*फेब्रुवारी महिन्यात दास नवमीचा उत्सव येत असतो. त्या निमित्ताने व्यासंगी लेखक श्री. शंकरराव मठ यांनी रामदास स्वामी व त्यांचे कार्य या संदर्भात पाठवलेला हा लेख. - संपादक*

महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून आणि कड्याकपारीतून दुमदुमत असलेली ही तेजस्वी वाणी कानी पडताच श्री समर्थ रामदासांची तेजस्वी मूर्ती डोळ्यासमोर उभी राहते. मुख्य हरिकथा निरुपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्व विषयी । असा उपदेश करत संपूर्ण महाराष्ट्र ज्यांनी हालवून खडबडून जागा केला व छत्रपति शिवरायानी चालविलेल्या स्वराज्य बांधणीच्या कार्यात ठिकठिकाणी मठ स्थापना करून प्रत्यक्ष मदत केली. वन्हि तो चेतवावा रे । चेतविताचि चेतितो । असा स्फूर्तिदायक मंत्र तरुणाना देऊन त्यांची संघटना उभी केली आणि राष्ट्राची अस्मिता जागी केली त्या महाराष्ट्रातील राष्ट्रसंताचा अल्पसा परिचय सांप्रतच्या तरुणासमोर ठेविल्यास उद्बोधक होईल, असे वाटते.

**संक्षिप्त चरित्र (बालपणाचा काळ)**

श्री रामदास स्वामी यांचा जन्म प्रभु रामचंद्राच्या जन्मदिवशीच म्हणजेच चैत्र शुद्ध नवमीस शके १५३० (इ.स. १६०८) या दिवशी मध्यान्ही जांब गावी झाला. त्यांच्या आईचे नाव राणूबाई आणि वडिलांचे नाव सूर्याजीपंत असे होते. रामदासाना शारीरिक व बौद्धिक सामर्थ्याची जन्मजात देणगी मिळालेली होती. बुद्धी तीव्र असल्यामुळे आजुबाजूच्या परिस्थितीची जाणीव इतर बरोबरीच्या मुलांपेक्षा त्यांना लवकर आकलन होत असे. इतरांपेक्षा आपण वेगळे जीवन जगावे, अशी महत्त्वाकांक्षा त्यांच्यात निर्माण झाली होती. वयाच्या अवघ्या १०/११ व्या वर्षीच एकांतस्थळी बसून 'चिंता करितो विश्वाची' असे आईला सांगणारे समर्थ हे असामान्य पुरुषापैकीच एक होत.

त्यांच्या घराण्यातील दैवत प्रभु रामचंद्र याची उपासना चाले. 'आमुचे कुळी रघुनाथ । रघुनाथे आमुचा परमार्थ । जो समर्थांचाही समर्थ । देवा सोडविना ।' दासबोध ६.७.२१

श्री रामचंद्राची उपासना करावी, त्याची कृपा संपादन करावी व महत् कार्य करावे, असे लहानपणीच त्यांना वाटू लागले. त्यांच्या वडिलांना व त्यांचे वडील बंधू श्री गंगाधर पंताना श्री रामानेच अनुग्रह केला होता. समर्थांनी पण तोच मार्ग स्वीकारला.

**पलायन व टाकळीस तपाचरण :-**

या तरुणाने विवाह बद्ध न होण्याचा निश्चय केला. आपल्या आईच्या वचनातून मुक्तता करून घेण्यासाठी समर्थ बोहल्यावर उभे राहिले. मात्र 'सावधान' हा शब्द कानावर पडताच ते लग्न मंडपातून पळाले. गोदेच्या काठाकाठाने ते नाशिकात पंचवटीमध्ये आले. तेथे श्री रामाच्या दर्शनाने त्यांना अत्यानंद झाला. पंचवटी जवळ टाकळीला गोदा व नंदिनी या नद्यांच्या संगमावर समर्थांनी बारा वर्षे पुरश्चरण केले. तपश्चर्येच्या आरंभकाळी रामदासांना लोकांकडून त्रास झाला. कारणावाचून छळ करणाऱ्या लोकाबद्दल त्यांना वाईट वाटे. जगात सज्जनांना नेहमीच छळ सहन करावा लागतो. ही गोष्ट त्यांच्या ध्यानात पूर्ण बिंबली. केवळ सरळ वागून चालत नाही म्हणून त्यांनी उपदेश असा केला आहे. 'धटासि धट । उद्धटासि उद्धट' व्हावे लागते. मात्र लहानपणापासून 'चिंता करितो विश्वाची' असे व्रत घेतलेल्या या साधु युवकाला लोकांना सुधारण्याची रात्रंदिवस चिंता लागलेली होती. सकल जन सुखी व्हावे, तो काळ कसा येईल? केव्हां येईल? हीच त्यांची चिंता होती. जवळजवळ चारशे वर्षांपूर्वी असा एक सत्पुरुष

जन्माला आला, ज्याने स्वत:च्या हिताचा काही एक विचार न करता आपल्या आयुष्याची चौतीस वर्षे भगवत् सेवा व स्वबांधवांच्या स्थितीचे चिंतन करण्यात घालविली. त्यावर उपाय शोधून काढण्यात दऱ्याखोऱ्यांच्या ठिकाणी आयुष्य कंठिले.

**पुनश्चरणाने समर्थांनी काय साधले?**

मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोन जाते । कृपा केलिया रघुनाथे । प्रचीत येते । दा. ६.७.१०

रघुनाथे भजने ज्ञान झाले । रघुनाथ महत्त्व वाढले । म्हणौनिया तुला केले । पाहिजे आधि । ६.७.११ ही रघुनाथ कृपा संपादन झाल्यावर समर्थ तीर्थ यात्रेला निघाले.

**तीर्थाटन व परिस्थिती अवलोकन :-**

सकलजन सुखी व्हावेत ही रात्रंदिवस चिंता लागलेली होती. त्यातच भयंकर दुष्काळाचे अस्मानी संकट उभे ठाकले. अशा वेळी ईश्वर भक्तीने स्वधर्म निष्ठ बनून, स्वार्थ, लोभ, आळस, सोडून प्रयत्नवादी बनणे हे लोकांचे कर्तव्य आहे व तेच त्यांच्या हाती आहे, या सद्गुणाच्या प्रसाराकरता देशव्यापी संघटना उभी करण्याचा विचार त्यांच्या मनात सतत निर्माण होत होता. शके १५५४ ते १५६६ (इ.स. १६३२ ते १६४४) पर्यंत समर्थांचे तीर्थाटन चालू होते. तीर्थाटन कुठे कुठे केले याची साद्यंत हकिकत गिरिधर स्वामी यांनी लिहिलेल्या 'समर्थ प्रताप' या चरित्रावरून लक्षात येते. तीर्थाटणे फिरावी । नाना सामर्थ्ये वाढवावी । वैराग्य बळे । १०.७.३३



तीर्थाटनाच्या निमित्ताने लोकस्थितीचे निरीक्षण चालू होते. ती स्थिती कशी बदलता येईल या योजना निश्चित होत गेल्या. तीर्थयात्रा प्रत्यक्ष अनुभवाचे शिक्षण असल्याने समर्थांनी या कार्यक्रमाला आपल्या जीवनात विशेष महत्त्व दिले. देशभर संचार केला. देशस्थिती प्रत्यक्ष अवलोकिली. अनेक शतकांच्या इतिहासाकडे त्यांचे लक्ष गेले.

**महाराष्ट्रातील कार्य :-**

सर्व आर्यावर्तभर पर्यटन करून समाजाची स्थिति पूर्णपणे अवलोकिली. पुढील नियोजित कार्यासाठी या पर्यटनाची नितांत आवश्यकता होती. ते शके १५६६ मधे कृष्णाकाठी चाफळ खोऱ्यात आले. ठिकठिकाणी मारुतीची स्थापना करून बलोपसनेला चालना दिली. मठ स्थापन केले. चाफळास श्री रामाची स्थापना केली. शिष्य संप्रदाय वाढविला. राम व हनुमान आदी देवतांचे उत्सव सुरू केले. शिवाजी महाराजांवर अनुग्रह केला व त्यांच्या आग्रहावरून ते सज्जनगडी राहावयास आले. शके १६०३ मधे अवतार कार्य संपवून (इ.स.१६८१) ब्रह्मीभूत झाले.

अशा प्रकारे समर्थांच्या जीवन चरित्राचे चार टप्पे स्पष्टपणे आढळतात. जन्मापासून पहिली बारा वर्षे बालपण त्याचवेळी विश्व कल्याण करण्याचा निश्चय. पुढील बारा वर्षे टाकळी येथे कठोर तपश्चर्या. तिसरी बारा वर्षे भारत भ्रमण. देशाटनानंतर उर्वरित आयुष्य चाफळ येथे कृष्णाकाठी निश्चित स्थान शोधून जीवनात मिळविलेल्या अनुभवाचे जन कल्याणासाठी विनियोग. या उर्वरित आयुष्यात फार मोठी कामगिरी. समर्थांच्या हातून घडलेली आहे. समाज संघटन, समाज प्रबोधन, राष्ट्रीय अस्मितेचे जागरण आदी कार्य त्यांनी प्रयत्नपूर्वक केले, मग सांगितले या पद्धतीने देव सेवा हीच राष्ट्रसेवा, या दोन्ही एकच आहेत, असा केवळ उपदेश करून न थांबता स्वत: आचरून तसा उपदेश केल्याने त्यांच्या शब्दाला एक प्रकारची प्रयत्नांची धार आलेली आहे. त्यांचे जीवनकार्य समजावून घेताना या गोष्टीचा कदापि विसर पडता कामा नये. अन्यथा आपण आत्माच गमावून बसू.

**समर्थांच्या घळी**

समर्थांचा पिंड कमालीचा अभ्यासू व चिंतनशील होता. ते सदैव आत्म परीक्षण व जन निरीक्षण करीत. लोकात घडलेल्या घटना, सर्व अनुभव, सर्व दृश्ये, सर्व

हालचाली यांची नोंद घेऊन त्या संबंधी एकांतात सुसंगत, सुसूत्र विचार करीत असत. या चिंतनासाठी व विचारासाठी त्यांनी घळींचा उपयोग केला. घळी हा त्यांच्या हक्काच्या जागा होत्या. समर्थ रामदास हे अवघ्या भारतीयांच्या भावनांचे भाष्यकार होते. मानवी जीविताच्या जीवनमूल्यांचे जाणकार होते. पंतु हे सारे भाष्य ही सारी मूल्ये, मानवी मना संबंधीचे सारे शोध या घळीतील प्रयोग शाळेत लागले. लोकांच्या नजरेच्या आड राहून लोकांच्या नजरेत भरेल अशी अलौकिक किमया त्यानी साधली. ती त्या घळीतील निर्मनुष्य एकांतपूर्ण वातावरणात. समर्थांच्या घळी म्हणजे राजकीय चिंतनाच्या प्रयोग शाळाच होत. समर्थांचे राजकारण म्हणजे भारतातील संत वाङ्मयातील एक महान् चमत्कार होय. या चमत्कारांचा केन्द्रबिंदू होत्या समर्थांच्या घळी. घळीमुळे त्यांचे राजकारण औरंगजेबासारख्या पाताळयंत्री राज्यकर्त्यांलाही कळले नाही. प्रसिद्ध अभ्यासक श्री वाळशास्त्री हरदास म्हणत, 'समर्थांचे शिष्य व मठ हेच शिवाजी महाराजांचे हेर खाते होते.' शिवथर घळीत 'दासबोध' हा ग्रंथ लिहिला गेला. भोर व महाड रस्त्यावर वरंधा घाट आहे. माझेरी खेड्याजवळ शिवथर फाटा निघून घळीकडे वळतो. कुंभे शिवथर व आंबे शिवथर या दोन गावांनी घळी वेढलेली आहे. घळी १०५ फूट लांब व ७५ फूट रुंद आहे. या घळीत सव्वाशे माणसे बसू शकतात. तिथे सांप्रत समर्थ व त्यांचे शिष्य कल्याण स्वामी यांच्या मूर्ती आहेत. श्रीधर स्वामींच्या शुभ हस्ते या मूर्तींची स्थापना झालेली आहे. या व्यतिरिक्त आणखी पाच सहा घळी आहेत. ज्यांच्या आश्रयाने रामदास स्वामी रहात असत.

**अध्ययन :-**

तपश्चर्येच्या बारा वर्षाच्या काळात समर्थांनी अध्यात्म ग्रंथांचे श्रवण केले आणि वाचन भरपूर केले. काव्य लेखनही चालू होते आणि हे पुढील काळातही चालू राहिले होते. त्यांच्या दासबोध ग्रंथावरून त्यांचे वाचन किती झाले होते याचा अंदाज करता येईल. शिव गीता राम गीता । गुरु गीता गर्भ गीता । उत्तर गीता अवधूत गीता । वेद आणि वेदान्त । भगवद्‌गीता ब्रह्म गीता । हंस गीता पांडव गीता । गणेश गीता येम गीता । उपनिषदे भागवत । इत्यादिक नाना ग्रंथांची यादी पाहून त्यांचे वाचन किती सखोल होते याची कल्पना येते.

दासबोधा व्यतिरिक्त, मनाचे श्लोक, अभंग, भूपाळ्या, करुणाष्टके, आनंदवनभूवनी, आदी संकीर्ण ग्रंथ काही बोधपर , काही उपासनापर लिहिले आहेत. मनाच्या श्लोकासंबंधी काही मंडळी त्याची विभागणी अशी करतात. श्लोक १ ते ६६ कर्मपर ६७ ते १३१ उपासनापर १३२ ते २०१ ज्ञानपर २०२ ते २०४ ज्ञान दृढ होण्यासाठी उपाय २०५ फलश्रुती. जीवन कसे तरी असहायपणे किंवा अजाणतेपणे जगावयाचे नसून ते एक निश्चित साध्य मनासमोर ठेवून जाणिवपूर्वक त्या साध्याच्या प्राप्तीसाठी दृढ साधना करून कृतार्थ होणे हा जीवन विचार श्री समर्थांनी स्वीकारलेला होता. त्याच्या अनुरोधाने मनाच्या श्लोकात हा विचार स्पष्ट केलेला आढळतो. करुणाष्टकात आर्तता आहे. या श्लोकात समर्थांनी मन मोकळे केले आहे. करुणाष्टके ही आर्त मनाचा सहजोद्गार आहेत! उदास वाटते जीवी । आता जावे कोणीकडे । तू भक्त वत्सला देवा । बुद्धि दे रघुनायका । रामा माझ्या जवळ काही नाही. संसार करावयाचा नाही हे मी ठरविले. परंतु मला परमार्थ कळत नाही म्हणून तुला विचारतो. 'तुझा मी तुला पुसतो सर्व भावे रघुनायका काय कैसे करावे ।'

संपूर्ण जीवनच एका विशिष्ट दृष्टिकोणातून न्याहळताना रामदास आढळतात. त्यातून समकालीन जीवनाची बौद्धिक, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक अशी झालेली वाताहत लक्षात येते. हा देश केवळ राजकीय दृष्ट्याच पोखरला गेला होता असे नव्हे तर जीवन जगण्यातील प्रत्येक मानवी व्यवहारात मागे खेचला गेला होता. नि:सत्व, गलितगात्र आणि विफल अशा भारत देशात रामदास आसेतु हिमाचल हिंडले व त्यांनी सर्व

समाजाची विफल अवस्था पाहिली. त्यातून त्यांच्या प्रयत्नवादाचा जन्म झाला. 'दुष्ट संहारिले मागे । ऐसे उदंड ऐकिलो। परंतु रोकडे काही । मूळ सामर्थ्य दाखवी ।एकची मागणे आता । द्यावे ते मज कारणे । तुझा तू वाढवी राजा। स्वये आम्हाचि देखता । अशी रोकडी प्रचीती पाहण्याची समर्थांना उत्कंठा लागलेली होती. त्यांचे भीमरूपी स्तोत्र सांप्रतही घरातघरातून म्हटले जाते.

**तुळशीदास व रामदास :-**

या उभयतांना एकच रामबाण औषध सापडले ते म्हणजे आदर्श प्रभू रामचंद्राच्या चरित्राचे गायन; श्रवण, मनन व त्याची उपासना. या उभय संतांचे जीवन राममय झालेले आढळते. यवनांचा नाश करून कल्याणकारी स्वराज्याची गुढी उभारावयाची होती म्हणून त्याना एक बाणी, एक वचनी, एकपत्नी अशा सर्व गुण संपन्न रामाचे आदर्श जीवन जनतेसमोर ठेवावयाचे होते. धनुर्धारी राम हेच उचित उपास्य दैवत होते. रामदासानी सुंदर कांड व युद्ध कांड लिहिले आहे. तुळसीदासजी रामचरितमानस लिहून चरित्र व चारित्र्य घडविण्याचे कार्य करून अजरामर झाले. तुलसीदास म्हणतात, 'मला भव्य दिव्य उदात्त आणि आदर्श अशा प्रभुरामचंद्राची गाथा सामान्य जनापर्यंत नेऊन पोचवावयाची होती. रामचंद्राचे चरित्र सर्वांचे अनंत कल्याण करणारे आहे. ते श्रवण केले असता कलिमल, मनोमल नाहीसा होतो. जुलुमी मानवी सत्तेचे जनतेला निष्प्राण, निष्प्रभ निर्बळ, निर्धन करून सोडले आहे. त्या स्वाभिमान शून्य थंड गोळ्याला 'मानस' जणू दिव्य संजीवनी लाभली. लोकामध्ये स्वधर्माविषयी अभिमान जागृत झाला. कर्तव्याची जाणीव झाली. जनता खडबडून जागी झाली, असे हे राम चरित मानस प्रभावी ठरले.

**रामदासाची कविता :-**

समाज प्रबोधनाचे ते एक प्रभावी साधन होते. विचार दर्शन घडविण्याचे एक अंग, ताठर कर्तृत्व, विजिगिषु महत्त्वाकांक्षा, आवेशपूर्ण, गविष्णु, तारतम्य यांचाच पाठपुरावा त्यांच कवितेत आढळतो. प्रखर बुद्धिवादाची बैठक कवितेला लाभलेली आहे. समाज निरीक्षणातून काव्य स्फुरण झालेले असल्याने आणि त्याच्या धगधगीत वैराग्याने, प्रखर बुद्धि तेजाने, विवेकनिष्ठ सावधपणाने काव्य लिहिले गेल्याने या साऱ्या गोष्टींचे प्रतिबिंब त्यांच्या काव्यात उमटलेले आहे. भूत काळाचा आढावा घेणारा, वर्तमानाशी इमान राखणारा, भविष्याची द्रष्टेपणाने जाणीव ठेवणारा कवी म्हणून रामदास एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होत. एक सार्वत्रिक आदर्श राष्ट्र घडविण्याचा प्रयत्न रामदास आपल्या शिकवणुकीतून करत.

**संसार व प्रपंचभेद :-**

पूर्वी लग्न फार लवकर होत असत. बयाच्या बाराव्या वर्षी समर्थांना बोहिल्यावर उभे राहण्याचा प्रसंग आला पण त्या लहान वयातही त्यांच्या ठिकाणी काही वेगळेच विचार येत होते. श्री रामचंद्राचे सख्यत्व जोडण्यासाठी घरदार, शेतीवाडी, जमीन जुमला, आई बंधू इत्यादिकांचा त्याग करून आपण पाश गळ्यात अडकवून घेण्यापूर्वीच ते तोडून टाकावे, असा निर्धार करून ते सावधान शब्द कानी पडताच बोहिल्यावरून पळाले. दास बोधात याचा उल्लेख करताना ते म्हणतात. 'देवाच्या सख्यत्वासाठी। पडाव्या जिवलगासी तुटी । सर्व अर्पावे सेवटी । प्राण तोही वेचावा ।४.८.८ इथे असा एक प्रश्न सहज निर्माण होतो. संसार करावा की न करावा याचे उत्तर शोधण्यापूर्वी समर्थांनी संसार व प्रपंच याबद्दल काय म्हटले आहे ते पाहाणे योग्य होईल. प्रपंच म्हणजे चरितार्थाचा धंदा, जीव याचे साधन, हा प्रपंच सोडून कोणाही व्यक्तीचे किंवा राष्ट्राचे चालावयाचे नाही. प्रपंच सोडून परमार्थ कराल ।तेणे तुम्ही कष्टी व्हाल। १३-१.२ संसार म्हणजे बायका पोरांचा संसार, आपले घर, आपली शेती, आपला पैसा आपली जिवलग माणसे इत्यादी. हा संसार करावा अगर न करावा पण प्रपंचात मात्र असा विकल्प नाही. प्रपंच हा केलाच पाहिजे. यावर त्यांचा कटाक्ष होता! प्रपंच सोडून परमार्थ केला ।तरी अन्न मिळेना खायाला ।अशा करंट्या माणसाच्या किंवा राष्ट्राच्या हातून

परमार्थ कसा व्हावा यासाठी पोटापाण्याची व्यवस्था आधी करावी व मग परमार्थ चर्चा करावी. आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका । १२-१.१ उदास वृत्ती धारण करून केलेला संसार परमार्थाच्या आड येत नाही. हे खरे असल्याने इतर साधुसंताप्रमाणे समर्थांनी पण सांगितले आहे. 'संसार सुखे करावा । परी काही परमार्थ वाढवावा । परमार्थ अवघाच बुडवावा । हे विहित नव्हे । समर्थांनी संसार केला नाही मात्र राष्ट्र प्रपंच जरूर केला.

**प्रपंच आणि परमार्थ विवेक :-**

समाज सन्मुख धर्म दृष्टी, त्यांचे स्वत:चे चारित्र्य संपन्न जीवन, त्यांचा लोक संग्रही कर्मयोग, सिद्धावस्थेतला व्यवहार, तत्कालिन सामाजिक दोषांची त्यानी केलेली परखड टीका व त्यातून दाखविलेला नैतिक विकासाचा मार्ग इत्यादींचे पुनर्मल्यन व्हावयास हवे. श्री समर्थांनी एकराष्ट्र, एकधर्म, एक वेष, एकसंघ समाज याचे स्वप्न डोळ्यापुढे ठेवून प्रपंच परमार्थ विवेक मांडला. भारताची राष्ट्रीय अस्मिता, धर्म समन्वयवादी दृष्टी, अद्वैत भूमिका आणि आध्यात्मिक जीवन दृष्टीवर पोसलेली सामाजिक सहकार्याची प्रेरणा याना त्यानी आव्हान केले आहे. मध्ययुगीन भारतातील मरगळलेल्या भारतीय सर्वसामान्य माणसात आध्यात्मिक राष्ट्रवाद फुलविण्याचे आणि भारतीय राष्ट्र व समाज याना सामर्थ्य व मोक्षधर्म यांचे प्रबोधन घडविण्याचे महान ऐतिहासिक कार्य त्यानी केलेले आहे. ते म्हणतात - सामर्थ्य आहे चळवळीचे । जो तो करील तयाचे । परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे । प्रयत्नवादाला - भगवत् अधिष्ठानाची जोड देवून देव व देश यांचा समन्वय सुंदर रीतीने व सहजपणे साधण्याचे कार्य त्यांच्या हातून घडले आहे. भगवत् भक्ती वाचून देशभक्ती नाही. किंवहुना भगवद् भक्ती हीच देशभक्ती. यत्न केलेच पाहिजेत -

हे कसे केले पाहिजेत, केव्हा केले पाहिजेत या बद्दल रामदासानी एक समर्पक दृष्टांत दिलेला आहे. नदीचे पाणी बांध घालून अडविले नाही तर निरर्थक वाहून जाते. आणि बांध घालून अडविल्यास त्याच्या तीरावर कालवे काढून पिकासाठी त्याचा उपयोग करता येतो. अनेक प्रकारची पिके मिळाल्याने जनहित साधता येते. त्याचप्रमाणष आपल्या जीवन प्रवाहाचे पण आहे ! ऐसे आयुष्य आपुले । विवेके सार्थक केले । का जे शोधुनि पाहिले । सारासार । जीवन व्यक्तिगत, सामाजिक, जागतिक असो, सर्व स्तरावर पद्धतशीर प्रयत्न व नियोजन हवे. यत्न करण्याची का आवश्यकता आहे याचे उत्तर अशाप्रकारे समर्थांनी दिले आहे. प्रयत्नासाठी शक्ती आवश्यक 'शक्तीचे नेटका प्राणी । वैभवे भोगिला दिसे । शक्य सर्व जो भोगी । शक्तिहीन दरिद्री । राम दासांचा प्रयत्नही बहु पदरी आहे. विकासाशी प्रयत्न व प्रयत्नासाठी सामर्थ्य या दोन्हीच्या मिलाफासाठी व्यवस्थित संघटना, अस्सल कार्यकर्ते, धुरंधर नेतृत्व व पैसा असणे आवश्यक. कार्यकर्त्यांतूनच मोठे नेते निर्माण व्हावेत. यत्न, सामर्थ्य, संघटना, कार्यकर्ते, नेते यांच्या आधारे समाजाची उन्नती साधू पाहणारे समर्थांचे तत्त्वज्ञान निर्धारित झाले होते. त्यांच्या विचारात केन्द्रस्थानी विवेक आहे. ते म्हणतात - वन्हि तो चेतवावा रे । चेतविताची चेतितो । विवेके जाणिजे तैसा । वाढविताच वाढतो । ज्ञानेश्वर महाराजांचा विवेक याहून वेगळा आढळतो. ते म्हणतात - विश्व झालिया वन्हि। संतमुखे व्हावे पाणी । हे व्यक्ति व समष्टीचे उत्तम नाते माउलीच्या जीवनात पाहावयास मिळते. सांस्कृतिक नेतृत्वाचे तत्त्वज्ञान आपल्या आचार विचारानी निर्माण करण्याचा प्रयत्न राष्ट्रसंत रामदासानी केला. नारायणाचा रामदास व रामदासाचा समर्थ हा त्यांचा विकास क्रम अत एव एका स्वयं सिद्ध नेतृत्वाची ग्वाही देणारा आहे. समर्थ या शब्दाची व्याख्या दासबोधात अशी देण्यात आलेली आहे. जितुके काही उत्तम गुण । जे समर्थांचे लक्षण । दास १९.४.३१, बहुत जनास चालवी । नाना मंडळे हालवी । ऐसी हे समर्थ पदवी । विवेके होते । दास १८.१०.४६ जो समाजाच्या सुखदु:खाची सूत्रे आपल्या हाती घेऊन साऱ्या

समाजाला चालवितो, त्याला कर्म प्रवण करतो व सन्मार्गावर आणून सोडतो तो समर्थ. रामदासाच्या ठिकाणी हे सर्व गुण होते. त्यानी याप्रमाणे वर्तन केले म्हणून त्याना समर्थ म्हणतात. पुढे आणखी असे म्हटले आहे 'अभ्यासे प्रगट व्हावे ।'नाही तरी झाकोन असावे । प्रगट होवोनी नासावे । हे बरे नोहे । १९.७.१७ अंगी गुण असल्यासच क्षमता येते. मगच, जितुके आपणासि ठावे । तितके हळुहळु सिकवावे । शहाणे करून सोडावे । बहुत जन । १९-१०.१४ तसेच परिस्थिती पाहून वागता आले पाहिजे. हा धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला । नानाबुद्धि शक्ताला । म्हणोन शिकवाव्या । १९-१०.२२ या प्रकारे संपूर्ण महाराष्ट्रात चैतन्य झाले आणि आपल्याकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

**एकांत सेवनाची गोडी :-**

चाफळ खोऱ्यात वास्तव्य केल्यानंतर ठिकठिकाणी मारुतीची स्थापना केली. लोकांना भजनाला लावले व आपण मात्र तेथे न राहता निर्जन स्थळी राहावयास गेले. सहसा ते कोणाच्या दृष्टीस पडत नसत. 'दास डोंगरी राहतो। यात्रा देवाची पाहतो । ते म्हणतात, अखंड एकांत सेवावा। अभ्यासचि करित जावा । काल सार्थकचि करावा । जनासहित । उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास शिकवावे । उदंड समुदाय करावे । परी गुप्त रूपे । आधि कष्ट मग फळ । कष्टचि नाही ते निर्फळ । साक्षेपेविण केवळ। वृथा पुष्ट । हे प्रचीतीचे बोलले । आधी केले मग सांगितले। मानेल तरी पाहिजे घेतले ॥ कोणी एक परमेश्वर काय करील ते खरे आहे हे म्हणणे योग्य आहे. पण आपण कष्ट केल्यावाचून परमेश्वर आपणास पाहिजे आहे ते देणार नाही, हेही खरे आहे. आपले कष्ट व परमेश्वरी कृपा या दोन्ही गोष्टी कार्य सिद्धीला सारख्याच आवश्यक आहेत. असा विचार करण्यासाठीच ते एकांत सेवन करीत असत.

**शिवराय व रामदास भेट :-**

चाफळ खोऱ्यात जगदुद्धाराचे कार्य समर्थांनी चालविले आहे, ही बातमी श्रीशिवाजी महाराजांना लागली. त्यांनी त्याची अति प्रयासाने भेट घेतली. ही भेट शिंगणवाडीस एका औदुंबराच्या वृक्षाखाली झाली, अशी वंदता आहे. त्या भेटीतून त्यांचे संबंध दृढ झालेले आढळतात. त्यानी त्यांच्या बद्दल दासबोधात जे लिहिले आहे, ते मुळातूनच वाचावे, असे म्हणावेसे वाटते. (पहा दशक १८ समास ६) तो किती अर्थपूर्ण आहे हे ध्यानात येईल.

अति सर्वत्र वर्जावे । प्रसंग पाहोत चालावे । दूर निग्रही न पडावे । विवेकी पुरुषे । ७

बरे ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभवानी। परंतु विचार पाहुनी । कार्य करणे । ९

म्लेंछ दुर्जन उदंड । बहुता दिवसांचे माजले बंड । या कारणे अखंड । सावधान असावे । १२

न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंग प्रकार । परि सिणे परांतर। देणे ईश्वराचे । १४

धर्म स्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । जाले आहेत पुढे होणार । देणे ईश्वराचे । २०

सकल गुणाचे सार । तजविजा विवेक विचार । जेणे पाविजे पैलपार । अस्त्र परस्त्रीचा । २२

तुळजा भवानीचे तुमचा पत्कर घेतला आहे. ती तुम्हास अंगीकृत कार्यात यश देईल तथापि तुम्ही आपल्याकडून जे करता ते विचाराने केले पाहिजे. श्री समर्थ व श्री शिवाजी महाराज यांच्यातील गाढ प्रेमाचा ओलावा इथे आढळतो.

**जन्माची सार्थकता :-**

देह परमार्थी लावावे । तरीच याचे सार्थक जाले । नाहीतरी वेर्थचि गेले । नाना आघात मृत्युपंथे । (१.१०.६१) केवळ संसार करण्याने नरदेहाची सफलता

(पान क्र. १८ पहा)

# मानवी साम्राज्यात प्राण्यांचे शोषण

*निसर्ग माणसाला भरभरून देतो, किंबहुना माणूस निसर्गाला ओरबाडत असतो. तो निसर्गाला काही देतो का? प्राण्यांचे शोषण करण्यात माणूसच आघाडीवर आहे. याबद्दलचे हे विचार - संपादक*

उत्क्रांतीच्या दृष्टिकोनातून 'मानव' प्राणी हे शेंडेफळ असले तरी त्याने आपल्या निसर्गदत्त बुद्धीच्या जोरावर सर्वच प्राण्यांना आपल्या अंकित केलेले आहे. सर्वच प्राण्यांना त्याने आपला गुलाम बनविलेले आहे आणि जणू काही सर्व प्राण्यांचा जन्म केवळ मानवाच्याच सुखासाठीच आहे. या कल्पनेने सर्व प्राण्यांना आपल्या वेठीस धरलेले आहे आणि त्यांचे कमी अधिक प्रमाणात आजतागायत अव्याहतपणे शोषण चालविलेले आहे. आज आपल्याला पृथ्वीच्या पाठीवर सगळीकडे मानवी वर्चस्व दिसत आहे, जणू काही मानवी साम्राज्यच ! सगळीकडे मानवी अस्तित्वाच्या खुणा, सगळीकडे मानवी अधिराज्य ! माणसाची घरे, मानवाने वसविलेली खेडी आणि शहरे, रस्ते, कारखाने, निसर्गामध्ये मानवाने चालवलेली ढवळाढवळ, हस्तक्षेप, नद्यांवर बांधलेली धरणे, आकाशातून संचार करणारी विमाने, समुद्र आणि महासागर यावरून संचार करणारी जहाजे, सगळीकडे माणूसच माणूस आणि त्याचे प्रताप !

त्यामानाने मानवेतर प्राण्यांची, पशुपक्ष्यांची संख्या माणसांच्या संख्येहून जास्त असून देखील त्यांचे अस्तित्व कुठे जाणवत नाही. सर्व मानवेतर प्राणी माणसाच्या दयाबुद्धीवर आणि मेहेरबानीवर लाचारीचे आणि केविलवाणे जीवन जगत आहेत. त्यांना जणू काही वेगळे अस्तित्वच नाही. माणसाच्या सेवेसाठी, सुखासाठीच जणू काही त्यांचा जन्म ! आणि माणसाच्या कृपेवर अवलंबून असलेले त्यांचे परावलंबी गुलामगिरीचे जीवन !

प्राण्यांच्या मानवाकडून होणाऱ्या शोषणाचा विचार करताना माणूस प्राण्यांना मारून त्याच्या मांसाचा अन्न म्हणून उपयोग करतो. या गोष्टीचा आपल्याला सर्वप्रथम विचार करावा लागेल. आदिमानवाला शेती कशी करावी याचे ज्ञान नव्हते. त्या काळात मासेमारी आणि प्राण्यांची शिकार हेच त्याचे उदरभरण्याचे मार्ग होते. परंतु माणूस जसजसा प्रगत होत गेला; तो शेती करू लागला तसतसा त्याने मांसाहार वर्ज्य करावयास हवा होता. परंतु तसे घडले नाही. मानवी दातांची रचना मांसाहाराला अनुकूल नाही कारण त्याला तीक्ष्ण सुळ्यांच्यापेक्षा चर्वण करण्यासाठी दाढा जास्त आहेत. शिवाय शाकाहारी प्राण्यांप्रमाणे अन्न पचण्यास वाव मिळावा म्हणून त्याच्या आतड्याची लांबी जास्त आहे, असे असुन देखील मानवाने आपल्या जिभेचे चोचले पुरवण्यासाठी मांसाहार चालूच ठेवला आहे आणि तो अनेक प्राण्यांची निर्दयपणे कत्तल करत आहे. वाघ-सिंहादी हिंस्त्र प्राणी सोडले तर माणूस कुठल्या प्राण्याचे, पशु-पक्ष्याचे मांस खात नाही, असे नाही. त्यामुळेच आपल्याकडे मुंबईमधील देवनार सारखे कत्तलखाने आणि अमेरिकेतील शिकागो सारखे प्रचंड कत्तलखाने अहोरात्र हजारो नव्हे लाखो प्राण्यांची कत्तल करण्याचे कार्य पार पाडत असतात. शेळ्या-मेंढ्या, गाय-बैल, रेडे-म्हशी या सर्वांचे मांस खाल्ले जाते. निरनिराळ्या प्रकारचे मासे याच कारणासाठी पकडले जातात. शिवाय शंख-शिंपले, खेकडे, इतकेच नव्हे तर बेडूक, साप, कासव इत्यादी प्राणीदेखील मांसासाठी मारले जातात. माकडे, चितळ, सांबर, हरीण, डुक्कर, ससे इत्यादी जंगली प्राण्यांचे मांसदेखील खाल्ले जाते. कोंबड्या, बदके, मोर इत्यादी पक्ष्यांचे मांस खाल्ले जाते. त्याचप्रमाणे कोंबड्यांची व

बदकांची अंडी, कासवाची अंडी देखील खाल्ली जातात. जगातील विविध प्रदेशातील आदिवासी आणि पुढारलेल्या जामातीदेखील उंदीर, गिनी पिग, झुरळांसारखे कीटक खाताना आढळून येतात. थोडक्यात 'All flesh is flesh' या न्यायाने मानवाला कुठल्याही प्राण्याचे मांस वर्ज्य नाही. न्यूगिनी सारख्या काही भागामध्ये अजूनही नरमांस भक्षक जमाती आहेत, असे म्हणतात. मानवाने विविध प्रकारे शेतीचे उत्पादन वाढविलेले आहे आणि निसर्गातील वनस्पती अनंत हस्ते त्याला फळे, भाजी-पाला, धान्य द्यावयास समर्थ असताना मानवाने चालविलेला प्राण्यांचा हा अकारण संहार समर्थनीय ठरतो का?

दुसरे असे की, प्राण्याचे शोषण वस्त्र निर्मितीसाठी म्हणजे काही नैसर्गिक धागे मिळविण्यासाठी केले जाते. आदिमानव प्राण्यांची शिकार केल्यानंतर त्यांच्या कातड्यांचा उपयोग वस्त्रासाठी करू लागला, ती क्षम्य गोष्ट होती. परंतु आजदेखील केसाळ प्राण्यांची शिकार केली जाते. ती समर्थनीय आहे का? शेळ्या-मेंढ्या याच्या पासून लोकर मिळवली जाते. त्यावेळी लोकर काढताना पुरेशी काळजी घेतली नाही, तर त्यांना दुःखापत, इजा होण्याची शक्यता असते. त्यांना जखमा झाल्यास वेदना होण्याची शक्यता असते. रेशमाच्या किड्यांपासून रेशीम मिळवताना तर लक्षावधी रेशमाचे किडे ते कोषावस्थेत असताना उकळत्या पाण्यात टाकून मारावे लागतात, ती हिंसा अमानुष नव्हे का? सध्या विविध प्रकारचे कृत्रिम धागे उपलब्ध असताना हे प्राण्यांचे शोषण थांबवणे मानवाला सहज शक्य आहे, नाही का? कातडी मिळवण्यासाठी साप, मगर, वाघ आणि अन्य प्राण्यांची हत्या केली जाते; आणखी प्राण्यांचे शोषण दुग्ध-उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर केले जाते. गाय, म्हैस, शेळी, मेंढी, उंट, गाढव अशा बहुतेक प्राण्यांचा माणूस दूध मिळवण्यासाठी उपयोग करत असतो. वास्तविक जे दूध निसर्गाने पिलांच्या संगोपनासाठी आवश्यक म्हणून निर्माण केलेले असते. त्याच्यावर मानवाचा अधिकार कसा पोहचतो ? आणि पिलांच्या तोंडून दूध काढून घेणे कितपत न्यायाला धरून आहे का?

केवळ हौसेखातर, छंद म्हणून देखील माणूस आजवर प्राण्यांची हत्या करत आलेला आहे. राजेरजवाडे, संस्थानिक यांनी शिकारीच्या छंदाखातर आणि आपल्या शौर्याचा बडेजाव मिरवण्यासाठी असंख्य वाघ-सिंह, हरणे यांची शिकार केलेली आहे त्यामुळे प्राण्यांच्या बऱ्याच जाती नष्ट झालेल्या आहेत आणि काही लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. बऱ्याच जाती दुर्मिळ झालेल्या आहेत. हस्तिदंतासाठी हत्तींची शिकार केली जाते, कातड्यासाठी आणि वाघनखांसाठी वाघांची शिकार केली जाते. गेंड्याच्या शिंगासाठी त्यांची हत्या केली जाते; घोरपड आणि वटवाघुळ यांच्या तेलामध्ये औषधी गुणधर्म असतात, या भ्रामक समजुतींतून त्यांची हत्या केली जाते. माणसाच्या तावडीतून आणि त्याच्या दुष्ट नजरेच्या कचाट्यातून कुठलाही प्राणी सुटलला नाही; हेच खरे !

सर्व प्राणी हे मुळात जंगली होते. माणसाने त्यांना पाळले म्हणजे माणसाळावले ते स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांच्याकडून आपली सेवा करून घेण्यासाठी, त्यांच्याकडून विविध प्रकारची कष्टाची कामे करून घेऊन, स्वतःचे कष्ट कमी करण्यासाठी बैल, रेडे यांच्याकडून तो शेतीची विविध प्रकारची कामे करून घेऊ लागला. काही ठिकाणी घोडे, उंट हे प्राणी देखील नांगराला जुंपले जातात. मालवाहतुकीसाठी बैलांना बैलगाडीला किंवा घोड्यांना टांग्याना जुंपले जाते. माल वाहतुकीसाठी गाढव, खेचर, उंट, हत्ती इत्यादी प्राण्यांचा उपयोग केला जातो. घरामध्ये कुत्रा, मांजर, इत्यादी प्राणी पाळले जातात. स्वतःच्या मनोरंजनासाठी, स्वतःच्या हौसेखातर ससा, पोपट, मैना, मुंगूस, पांढरे उंदीर इत्यादी प्राणी देखील पाळले जातात. पण त्यांच्या स्वातंत्र्याचे काय? त्यांच्या निसर्गदत्त स्वातंत्र्यावर गदा आणून आपण त्यांना बंदिवासात ठेवून

गुलामगिरीचे जीवन जगायला भाग पाडतो. हा अधिकार आपल्याला कोणी दिला? सर्कशीमध्ये देखील घोडे, हत्ती, चिंपाझी, वाघ, सिंह, कुत्रे, माकडे, पोपट इत्यादी प्राण्यांकडून विविध प्रकारचे खेळ करून दाखवले जातात. माणसाची औट घटकेची करमणूक होते. परंतु हे सर्व प्राणी आपल्या स्वातंत्र्याला मुकतात त्याचे काय? माणसाचे मनोरंजन होते पण त्या बिचाऱ्या प्राण्यांचे संपूर्ण जीवनच दुःखमय होते; त्याला कोण जबाबदार? सध्याच्या यांत्रिक शेतीच्या काळात आणि दळणवळणाची अनेक साधने उपलब्ध असताना माणसाला प्राण्यांच्या सेवेची खरोखरच गरज आहे का? टी.व्ही., सिनेमा, नाटके, खेळ इत्यादी मनोरंजनाचे विविध मार्ग उपलब्ध असताना सर्कशीमध्ये फक्त मानवी कसरतींचे प्रदर्शन केले तर नाही का चालणार?

त्यानंतर ज्या क्षेत्रामध्ये मानवी कल्याणाच्या नावाखाली प्राण्यांचे शोषण चालू आहे, ते म्हणजे वैद्यकीय संशोधन. कुठलेही वैद्यकीय संशोधन मानवावर करण्यापूर्वी त्याचे प्रयोग आधी प्राण्यांवर केले जातात. या कामी प्रामुख्याने उंदीर, गिनी पिग, माकडे यांचा उपयोग केला जातो. विविध प्रकारच्या लसी शोधून काढण्यासाठी किंवा विविध रोगांवरील औषधे शोधून काढण्यासाठी या प्राण्यांना विविध हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते. त्यांना विविध रोगांचे जंतू मुद्दाम टोचले जातात. म्हणजे तो रोग त्या प्राण्यांच्या शरीरामध्ये कृत्रिमरित्या निर्माण केला जातो आणि त्या नंतर ती लस किंवा त्या औषधाची योजना केली जाते. परंतु त्यासाठी या प्राण्यांना मरण पत्करावे लागते किंवा कित्येकदा मरणापूर्वी मरणप्राय यातना सहन कराव्या लागतात. अशा रीतीने मानवाच्या निरामय जीवनाचा मार्ग प्राण्यांच्या क्लेशातून जात असतो, असे खेदाने म्हणावे लागेल.

मानवी सुखाची इमारत प्राण्यांच्या शोषणावर उभारलेली आहे, असे हे काहीसे काळेकुट्ट चित्र आहे. परंतु त्याला ही थोडीसी चंदेरी किनार आहे. माणूस प्राणी पाळतो, त्यांना स्वार्थासाठी का असेना, थोडे फार प्रेम देतो, त्यांचे संगोपन करतो, त्यांची काळजी घेतो. त्यांचे संरक्षण करतो. शासनाने देखील प्राणी संरक्षणाचे कायदे केलेले आहेत. वन्य प्राण्यांच्या शिकारीवर आता बंदी आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशामध्ये पाळीव प्राण्यांची हेळसांड केली म्हणून मालकाला शिक्षा करण्याची कायद्यामध्ये तरतूद आहे. आपल्या देशामध्ये देखील मनेका गांधीसारख्या काही 'प्राणी मित्र' व्यक्ती आणि प्राणी मित्र संघटना प्राण्यांचे संरक्षण करणे गरजेचे आहे आणि त्यांचे शोषण थांबविणे आवश्यक आहे, अशा प्रकारचे विचार प्रस्तृत करून जनतेमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याच प्रयत्नातून बेवारस कुत्र्यांची हत्या थांबविली गेलेली आहे. सर्कशीतून दाखविले जाणारे वाघ-सिंहादी प्राण्यांचे खेळ बंद पडलेले आहेत. माणसाला आपण देखील इतर प्राण्यांमध्ये एक प्राणी आहोत आणि प्राण्यांचे शोषण थांबविल्यातच. आपले माणूसपण आहे, याची जाणीव होईल, तो प्राण्यांच्या आणि माणसांच्या दृष्टीने देखील सुदिन !

श्री. प्रभाकर द. अरदकर
सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय,
ठाणे.

दिशा
नियमित वाचा

आपली मते जाणून घेण्यास
आम्ही उत्सुक आहोत.

# Statistics - एक दिशा

*संख्याशास्त्र हा एक सर्वव्यापी विषय आहे. वांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे संख्याशास्त्र प्रमुख प्रा. अशोक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या विषयावर विद्यार्थिनींनी बनविलेल्या या लेखातून या विषयाच्या सर्वव्यापी स्वरुपाची कल्पना येऊ शकेल - संपादक*

दैनंदिन जीवनात आपण कितीतरी वेळा गणिताचा वापर करतो. पण खरंतर आपल्याला 'Pure Mathematics'पेक्षा 'Applied Mathematics' चाच जास्त उपयोग होतो. Statistics ही 'Applied Maths'चीच एक शाखा आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. अनेक साध्या-साध्या गोष्टींचा तसेच एखाद्या गुंतागुंतीच्या समस्यांचा आपल्या जीवनावर होणारा परिणाम Statisticsमध्ये अभ्यासला जातो. आपल्या नकळत आपण कितीतरी वेळा Statistical तंत्राचा आधार घेत असतो. उदा. 'शितावरून भाताची परीक्षा' या उक्तीप्रमाणे अनेक गृहिणी भात नीट शिजला की नाही हे एका शिताची परीक्षा करून ठरवतात. याच तत्वावर 'statistics' मधील अत्यंत महत्त्वाचे 'Theory of sample survey' आधारित आहे. तसेच एखाद्या विद्यार्थ्यांची हुशारी ठरवण्यासाठी त्याचे सरासरी गुण पाहिले जातात. त्यावरून त्याची अभ्यासातील प्रगती ठरवली जाते. म्हणजे विद्यार्थ्यांची हुशारी आणि त्याने मिळवलेले गुण यांच्यातील संबंध शोधण्यासाठी statistics चाच वापर होतो.

हे एखाद्या समूहाची संख्याविषयक माहिती किंवा समूहाचे गुणधर्म अभ्यासण्याचे उत्तम शास्त्र आहे. अनेक वेळा आपण पाहतो की दोन भिन्न असणाऱ्या गोष्टी परस्परांवर अतिशय परिणाम करतात. अशावेळी त्या दोन गोष्टींमधील परस्परसंबंध शोधून काढण्यासाठी statisticsचा वापर होतो. उदा. रासायनिक खताच्या वापरामुळे पीकांचे उत्पादन वाढण्यास मदत होते. परंतु खतांच्या अवाजवी वापरामुळे जमीनीचे नुकसानही होऊ शकते. अशावेळी पिकांसाठी खतांचे योग्य प्रमाण माहीत असणे गरजेच आहे. Agricultural Science मध्ये हा अभ्यास केला जात असला तरी तो statisticsच्याच आधारावर केला जातो.

राजा तोडरमलच्या काळातही महसुलमंत्री statisticsच्याच आधारे जमीन आणि शेतीविषयक माहितीची नोंद ठेवायचे. राजा अकबराच्या नऊ रत्नांपैकी एक 'अबुल फजल' याने लिहिलेल्या 'ऐना-ए-अकबरी' या ग्रंथात त्याकाळात केलेल्या राज्यकारभाराविषयक आणि statistical survey याविषयक केलेल्या माहितीची नोंद आढळते. त्यावरून असे दिसून येते की, statisticsचा इतिहास मनुष्याच्या इतिहासाएवढाच प्राचीन आहे. statisticsची सुरवात झाली तेव्हा ते 'science of statecraft' (राज्यकलाशास्त्र) म्हणून ओळखले जायचे. जवळजवळ २००० वर्षांपूर्वीपासून आपण त्याचा वापर करत आहोत.

आधुनिक काळात statisticsकडे फक्त संख्याविषयक माहिती एकत्र करण्याचे शास्त्र म्हणून पाहिले न जाता वस्तूमध्ये सुधारणा व तिचा व्यवस्थित वापर करून जास्तीत जास्त मोबदला मिळविण्याचे विकसित तंत्र म्हणून बघितले जाते. केवळ एखाद्या राज्यातल्या अंतर्गत घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी न वापरले जाता, त्याचा राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक जीवनातला सहभाग वाढत आहे. अचूक निष्कर्ष काढण्यासाठी statisticsचा वापर होतो. त्यामुळेच जीव, भौतिक, शैक्षणिक, शेतकी, आर्थिक, मानसशास्त्र, व्यापार आणि

सामाजिक शास्त्रांमधील त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

या स्पर्धेच्या युगात सर्वचजण स्वत:ची प्रगती करण्यासाठी धडपडत असतात. सुनियोजित आणि योग्य अशा योजनेमुळेच प्रगतीचा मार्ग सुकर होण्यास मदत होते. कोणतीही योजना योग्य त्या निष्कर्षांवरच अवलंबून असते. परंतु हे निष्कर्ष कोठेही आयते मिळत नाहीत. अनेक गोष्टींच्या गुंतागुंतीच्या माहितीवरूनच ते मिळवावे लागतात. अर्थातच येथे statisticsचा उपयोग होतो. सरकारही जनतेच्या कल्याणासाठी पंचवार्षिक योजना तयार करते. ही योजना जनगणनेमध्ये मिळालेल्या माहितीच्या आधारावर तयार केली जाते. प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींची संख्या, वय, देशातील साक्षरतेचे, जन्म-मृत्युचे तसेच दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींचे प्रमाण लक्षात घेतले जाते. या सर्व माहितीचे योग्य त्या प्रकारे वर्गीकरण करून उपयुक्त असे निष्कर्ष काढले जातात व त्यावरूनच सरकार आपली धोरणे निश्चित करते.

प्रत्येक व्यक्ती सुरक्षिततेच्या कारणासाठी, वृद्धापकाळात पैशाच्या सोयीसाठी, तसेच इतर अनेक कारणासाठी विमा उतरवते. वेगवेगळ्या विमा कंपन्याही आपल्या आकर्षक विमा योजना तयार करण्यासाठी statisticsचाच वापर करतात. कोणत्याही विम्याचा काळ, हप्ते, त्यातून अनेक गोष्टी विमा योजना तयार करतात, विचारात घेतल्या जातात. statisticsमधील 'Acturial Science' या शाखेत विम्यासंबंधीचाच अभ्यास केला जातो.

अर्थव्यवस्थेमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय statisticsच्या तंत्रावर अवलंबून असतात. Index Number ही अर्थव्यवस्थेतील मूलभूत संकल्पना आहे. व्यक्तीच्या मिळकतीमध्ये काळानुरूप होणारा बदल अभ्यासण्यासाठी Index Number विकसित केले गेले आहे. Index Number हे अर्थव्यवस्थेतील चलनवाढ अथवा चलनघट दर्शवितात. अर्थव्यवस्थेत होणाऱ्या हालचालींवरच उद्योग जगतातील अनेक निर्णय व योजना अवलंबून असतात. वस्तूंच्या किंमती, उत्पादन, आयात-निर्यात, नफा-तोटा यासंबंधीच्या Index Numberचा वापर अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी होतो. थोडक्यात अर्थव्यवस्थेच्या हृदयाचे ठोके मोजण्यासाठी Index Numberचा वापर होतो.

हवामान शास्त्रातही statisticsचा समावेश आहे. चेरापुंजी हे जगातील सर्वाधिक पावसाचे ठिकाण ठरविले गेले आहे. दिवसाचे सरासरी तापमान, आर्द्रता ठरविण्यासाठी तसेच हवामानाबद्दलचा अंदाज वर्तविण्यासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या statisticsचाच वापर होतो.

केवळ सरकारी क्षेत्रातच नाही तर औद्योगिक क्षेत्रातही statisticsला महत्त्व आहे. 'Theory of sample survey'च्या साहाय्याने ग्राहकांच्या निरनिराळ्या गरजा, एखाद्या उत्पादनाबद्दलची त्यांची मते जाणून घेता येतात. त्याद्वारे उत्पादनाचा दर्जा ठरविला जातो. उत्पादनाचा दर्जा नियंत्रित करण्यासाठी 'statistical Quality Control'चा आधार घेतला जातो. तसेच ग्राहकांच्या गरजा विचारात घेऊन उत्पादनात बदल करणे आवश्यक आहे की नाही ते ठरविता येते. त्यामुळेच एखाद्या उद्योगाची प्रगती कमी-अधिक प्रमाणात statisticsच्या निष्कर्षावर अवलंबून असते. कारण चुकीच्या निष्कर्षांवर आधारलेल्या अवाजवी अपेक्षा उद्योगासाठी प्रचंड संकट निर्माण करू शकतात. यशस्वी उद्योगासाठी उत्पादनाबद्दलची सर्व माहिती असणे अत्यंत आवश्यक असते. उदा. तयार कपड्यांचा उद्योग करण्यासाठी एकूण मागणी, कच्च्या मालाची किंमत, दर्जा, रंग पोत, आकार तसेच लागणारा वेळ इ. बद्दलची माहिती अत्यावश्यक असते. वरील गोष्टींच्या प्रमाणबद्ध माहितीवरूनच statisticsच्या साहाय्याने उत्पादनाचा नियोजनबद्ध

आराखडा तयार केला जातो व अंमलात आणला जातो. म्हणूनच अनेक मोठ्या औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रांमध्ये प्रशिक्षित आणि कार्यक्षम संख्या शास्त्रज्ञांची गरज आहे.

शेतकी शास्त्रातही statisticsला भरपूर वाव आहे. शेतीबाबतचे जवळजवळ सर्व निर्णय त्यावरच अवलंबून असतात. जमिनीची उत्पादन क्षमता, बी-बियाणांचा दर्जा, रासायनिक खते, कीटकनाशके यांचा पीकांवर होणारा परिणाम यांचा अभ्यास statistics मधील 'Designs of experiments'च्या आधारावर केला जातो. शेतीमध्ये अनेक कारणांमुळे अनिश्चितपणा येतो. उदा. अनियमित पाऊस, दुष्काळ इ. परंतु अनिश्चित परिस्थिती आणि अपूर्ण माहितीच्या आधारावर सुद्धा या परिस्थितीत मार्ग काढता येतो. शेत मालाचा दर्जा निश्चित करून त्याची योग्य ती किंमत ठरविली जाते व त्यानुसारच शेतकऱ्यांना मोबदला दिला जातो. शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकार अनेक योजना राबवते. उदा. - बी-बियाणे, खते यांच्या खरेदीसाठी आर्थिक मदत अनेक सरकारी संस्थाही कमी व्याजदरात शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देतात.

Statisticsमधील 'Principle of Least Square' हे तत्व वापरून 'Theory of Gaussian Normal Laws & Errors' विकसित केलेली आहे. तिचा उपयोग खगोल शास्त्रात ग्रह-ताऱ्यांच्या हालचालींचा अभ्यास करण्यासाठी होतो.

जीवशास्त्रामध्ये सुद्धा 'Bio-statistics' ही शाखा निर्माण झालेली आहे. महान शास्त्रज्ञ 'फ्रान्सिस गॅल्टन' यांनी प्रथमच statistical पद्धती आणि जीवशास्त्रातील सिद्धांत (Theory) यांच्यातील परस्परसंबंध शोधून काढला. मेन्डेलिफ यांनी सुधारित कलमांची निर्मिती करण्यासाठी statistical तत्वांचा आधार घेतला व अनेक प्रयोग यशस्वी केले.

एखाद्या प्रदेशातील प्राणिजीवनाचा अभ्यास करण्यासाठी Bio-statisticsचा आधार घेतला जातो. उदा. कारखान्यांद्वारे सोडल्या जाणाऱ्या प्रदूषित पाण्याचा, माशांच्या जीवनावर परिणाम होतो. प्रदूषित पाण्यातील रसायनांचे प्रमाण व त्यांच्या माश्यांच्या वाढीवर, प्रजननक्षमतेवर, आयुमानावर होणारा परिणाम यांच्यातील परस्परसंबंध statisticsमधील 'correlation coefficient' या तत्वाच्या आधारे अभ्यासला जातो. या अभ्यासाद्वारे निघालेल्या निष्कर्षांच्या आधारे प्रदूषित पाण्यातील हानिकारक रसायनांचे प्रमाण ठरविले जाते आणि त्यावर नियंत्रण मिळविले जाते.

वैद्यकीय शास्त्रातही औषधनिर्मितीच्या प्रक्रियेत statisticsचा वापर होतो. रोगाची कारणं, लक्षणं, संसर्ग याबाबतची माहिती अभ्यासून त्याप्रमाणे त्यावर गुणकारी औषधाची निर्मिती केली जाते. रोगाबद्दलची सर्व माहिती गोळा करून तिचे विश्लेषण करण्यासाठी तसेच औषधाचा रोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी statisticsचा उपयोग होतो. औषधे व इंजेक्शन याची कार्यक्षमता तपासण्यासाठी statisticsमधील 't-test'चा वापर केला जातो. याचा उपयोग औषधाची तीव्रता व त्यामुळे होणाऱ्या अपायांचे प्रमाण कमी करण्यासाठी होतो.

'TRP- कार्यक्रमाची जान. कार्यक्रमाची लोकप्रियता ठरविण्यासाठी TRP rates चा वापर होतो. Sample survey च्या TRP-rates आधारे काढले जातात. 'सॉंस-बहू' मालिकांचे TRP rates सध्या सर्वात वर आहेत. त्यामुळे अनेक वाहिन्या अशा मालिकांना अग्रक्रम देतात. जाहिरातदारही अशा मालिकांमधूनच स्वत:ची जाहिरात प्रसारित करण्यासाठी प्रयत्न करतात. यावरूनच Television क्षेत्रातले अत्यंत महत्त्वाचे निर्णयही statistics च्या आधारे घेतले जातात हे समजते.

करमणूक, खेळ, मनोरंजन अशा अनेक क्षेत्रात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे statistics कार्यरत आहे. क्रिकेट हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय ! सध्या World-Cup कोण घेऊन जाणार, याची चर्चा जोरावर आहे. ऑस्ट्रेलियाकडे सर्वात जास्त pointsची नोंद आहे. हे points त्या टीमने जिंकलेल्या मॅचेस, मॅचमधील टीमचे प्रदर्शन यावरून statistics च्या साहाय्याने ठरविले जातात. काही अपरिहार्य कारणांमुळे जर एखादी क्रिकेट मॅच अपूर्ण राहिली तर 'लुईस डॅकवर्थ' 'theory' च्या आधारे विजयी संघ घोषित करता येतो. या theory मध्ये दोन्ही संघाच्या फलंदाजीच्या पहिल्या २५ षटकांच्या धावांवरून विजयी संघाची निवड केली जाते. त्यामुळेच ही theory पूर्णपणे या तत्वावर आधारित आहे.

युद्धाच्या प्रसंगी जीवनावश्यक वस्तू तसेच दारुगोळा, शस्त्रास्त्रे इ.चा तुटवडा निर्माण होतो. यातून मार्ग काढण्यासाठी stats मधील 'operational research' या शाखेचा उदय झाला. 'Theory of Decision Function' च्या मदतीमुळे तयार केलेल्या लष्करी कारवायांमुळे कमीत कमी प्रयत्नांत शत्रूचा जास्तीत जास्त मुलुख उद्ध्वस्त करता येतो.

यावरून असे दिसते की, statistics आपणास उपयुक्त असे क्षेत्र आहे. परंतु ते उपेक्षित राहिले आहे. यासाठी जर विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधींचा वापर केला तर statisticsची खऱ्या अर्थाने यशस्वी वाटचाल होईल.

**प्रीती पाटील**
**प्राजक्ता नारखेडे**
**पूजा पाटील**
**प्राजक्ता लावंड**
एस.वाय.बी.एस.सी.
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

(पान क्र.११ वरून)

## जय जय रघुवीर समर्थ

नाही. संसाराचा आरंभ दुःखापासून होतो व मृत्यू वेदनेत त्याचा शेवट होतो. नरदेहाचा इष्ट हेतू सफल करून घेण्याचा आपण जर प्रयत्न केला नाही तर असा अमौलिक जन्म प्राप्त होऊनही फुकट दवडल्यासारखे होणार आहे. आपली सांप्रत अशी धारणा झाली आहे की 'मंत्रपूजाध्यान । सर्वही द्रव्यदास । ५.७.४७ ज्याच्याजवळ पुष्कळ पैसा, तो श्रीमंत, तो गुणवान्, लौकिकवान्, तो कुलीन तो विद्वान । यस्याहित स नरः कुलीनः सबुद्धिमान् सामान्य । परंतु समर्थ म्हणतात - परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाही तो भिकारी । १.९.२३ परमार्थ हा त्यांच्या शिकवणुकीचा गाभा आहे, हे ध्यानात ठेवावे.

**उपसंहार :-**

विश्वात्मकता व राष्ट्रीय अस्मिता यांच्या दुहेरी तापात आज जगातील प्रत्येक समाज उभा आहे. आपला समाज, त्याची विशिष्ट परंपरा, तो जपणे, प्रगत करणे, असा एका बाजूने प्रयत्न होतो आहे. आणि दुसऱ्या बाजूने माझा समाज व परंपरा जगासाठी काय करू शकतो, याचेही फतवे काढले जातात. यासाठी सनातन धर्मात, विश्वधर्म, विश्वसंस्कृती ही क्षमता अवश्य आहे, हे समजून सूज्ञपणे व्यवहार केल्यास या प्रसंगातूनही राष्ट्र व विश्व यांच्याशी मेळ घालनू व्यवहार करता येईल. रामदासांचे राजकारण या धर्मरक्षणार्थ आहे, हे लक्षात आल्यास श्री छत्रपती शिवरायाबद्दल काढलेले उद्गार किती अर्थपूर्ण आहेत, हे ध्यानात येईल. ते म्हणतात.

निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।

**श्री. शं. बा. मठ**
६, आशिष, राम मारुति रोड,
ठाणे - ४०० ६०२.

# श्रीमद्भगवत् गीता (अध्याय ११ वा) ।। विश्वरुप दर्शन योगः ।।

(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी)

श्रीमती भिडे यांचा गीतेवरील लेखमालेतील हा ११ व्या अध्यायावरील लेख. - संपादक

हे भगवंता, अध्यात्मनामक गुह्य ज्ञानाने माझा मोह गेला आता मला 'विश्वरुपदर्शन' देशील ? अर्जुनाने एखाद्या लहान मुलाने म्हणावे 'बाबा माझा अभ्यास झाला आता मला बॅट घेऊन द्याल?' तितक्याच निरागसतेने भगवान श्रीकृष्णाला विचारले.

तत्वज्ञानाच्या दृष्टीने मागील अध्यायात ज्या 'अक्षर तत्वाचे' निरुपण भगवंतांनी केलेले आहे, त्याचे प्रत्यक्ष दर्शन या अध्यायात घडवले आहे. परमात्म्य -दर्शनाची भव्यता, सुंदरता, उग्रता, तेजस्विता पाहून मन आनंदित होते पण भीषण रौद्र रुपाने व्याकुळही होते. ती दिव्य दाहकता नकोशी वाटते, असे विलक्षण दृश्य या अध्यायात दिसते. ज्ञानेश्वर महाराज या अध्यायास प्रयाग माधवाचे पावित्र्य बहाल करतात. शांत रसा घरी अद्भूत रस पाहुणचारास आला आहे व इतरही रस लग्नात नवरा-नवरीबरोबर वऱ्हाडीही पाहुणचार घेतात तसे पंक्तीस बसले आहेत, असे ज्ञानेश्वर महाराज वर्णन करतात.

हे श्रीकृष्णा, तू मला परमगुह्य अध्यात्मज्ञान दिलेस त्यामुळे मी देह आहे. हे कौरव माझे आप्त आहेत. त्यांना मारले तर मला पाप लागेल, असा जो अज्ञानजन्य अहंकार व मोह माझ्यात निर्माण झाला होत तो समूळ गेला. भूतांची उत्पत्ती व प्रलय हा भगवंताचा स्वभाव आहे हेही कळले. आता त्या 'अविनाशी तत्वाचे' दर्शन घ्यायची माझी इच्छा आहे मला ते दर्शन घेणे शक्य असेल तर ते ऐश्वर्ययुक्त रुप दाखव.

अर्जुनाने दाखव म्हणण्याचा अवकाश भगवंत म्हणाले, 'अर्जुना माझी नाना प्रकारची, नाना रंगाची व नाना आकाराची शेकडो हजारो दिव्य रुपे बघ.' वासराला पाहून गायीला पान्हा आवरू नये, तसे भगवंताला झाले. 'पश्य मे पार्थ रुपाणि शतशोऽथ सहस्त्रश: । हे बारा आदित्य, आठ वसू, अकरा रुद्र, अश्विनीकुमार आणि पूर्वी न पाहिलेली अनेक आश्चर्ये पहा. या माझ्या केसांच्या बुडाशी निरनिराळ्या अनेक सृष्टी पहा. भगवंतांनी आपला प्रोजेक्टर चालू केला. मग त्यांच्या लक्षात आले अजून अर्जुन काहीच बघू शकत नाहीये. मग त्यांनी त्याला दिव्य सृष्टी दिली. व्यासकृपेने संजयालाही ती मिळाली होती.

पृथ्वी, अंतरिक्ष व स्वर्गलोक या तिहींना व्यापणारे विश्वरुप. या तीहींनाच वटु वामनाची तीन पाऊले म्हणतात. भगवंताने आपल्या योग सामर्थ्याने ते परमात्म स्वरुप प्रगट केले.

| | | |
|---|---|---|
| पृथ्वी - जडतत्व | } | या तीन तत्वांचे एकाच |
| अंतरिक्ष - विरल तत्व | | वेळी दर्शन म्हणजेच विराट |
| स्वर्गलोक - तेजतत्व | | विश्वरुप दर्शन. |
| | | परमात्म्याचे समग्र दर्शन |

अर्जुनाला आता ते दिव्य विश्वरुप, आश्चर्यकारक असे दिव्य अलंकारयुक्त दिसू लागले.

हे दर्शन 'तेजतत्वाचेच' । त्यामुळे ते लखलखीत प्रकाशाचेच दर्शन होते. ज्ञानदेवांनी परमात्म्यास 'चित् - सूर्य' म्हटले आहे. प्रकाशाचा निर्गुण - निराकार दर्याच जणू. भगवंत म्हणाले 'नाना वर्णांची आकृतींची रुपे पहा. ती रुपे 'दिव्य' आहेत. दिव्य म्हणजे लखलखीत, प्रकाशमान. ही दिव्य रुपे पाहताना हर्ष व भीती एकाचवेळी

उत्पन्न होते. या रुपात 'अनेक सूर्य' व अनेक विश्वे तरंगतांना दिसत होती. जर आकाशात सहस्त्रावधी सूर्यांचा उदय झाला तर जो प्रकाश प्रगट होईल तो त्या विश्वरुप परमात्म्याच्या प्रभेची काहीशी बरोबरी करु शकेल, असे संजय धृतराष्ट्राला विश्वरुपाचे वर्णन करून सांगत आहे.

दिव्य परमात्म स्वरुप पाहून अर्जुन विनम्र झाला. हात जोडून तो म्हणू लागला - हे भगवंता तुझ्या शरीरात मी सर्व देवांना, सर्व भूतांना कमलावर बसलेल्या ब्रह्मदेवाला, महादेवाला, तसेच सर्व ऋषींना पहात आहे. त्याचप्रमाणे दिव्य सर्वांना (विजेचे लोळ) पहात आहे. एकाच परमात्म्याची तीन स्वरुपातील शक्ती (निर्माण-पालन-संहार) दृगोचर होत आहे. विराट चैतन्य अनेक दिव्य प्रवाहांनी युक्त आहे, हेही अर्जुनास ज्ञान झाले. कुंडलिनी ही जशी शरीरातील तेजाची नागिण. तसेच परमात्म्याच्या समग्र स्वरुपात असेच दिव्य सर्व दिसत आहेत, असे अर्जुनाने म्हटले. हे सर्वेश्वरा आपणाला अनेक मुखे, अनेक उदरे, अनेक हात, अनेक नेत्र असून अनंत रुपांनी आपण नटला आहात. आपणास आदी-मध्य-अंत असे काहीच नाही हेही मला प्रत्यक्ष दिसत आहे. सर्व विश्व म्हणजे चैतन्याचीच रुपे. त्यामुळे विश्वातील सारे हात, सारे नेत्र, सारी मुखे, सारी उदरे त्याचीच आहेत. हे आपल्याला कळते. म्हणून 'अनंत रुपे, अनंत वेशे देखिले म्या त्यासी' ज्ञानेश्वरांची अनुभूती मनाला पटते.

चैतन्याचा सागर उचंबळतो, सागर लाटावर फेस यावा, तसे विश्व निर्माण होते नि बुडबुडे फुटावे तसे ते विलीनही होते. ही प्रक्रिया अखंड चालू असते. त्यामुळे विश्व नाही अशी स्थिती नसतेच. हा सागर कधीपासून उचंबळतो आहे, हे कोणालाच माहीत नाही. त्यामुळे चैतन्य सागराला व या विश्वालाही आदी-मध्य-अंत नाहीच.

किरीटयुक्त, गदायुक्त, चक्रयुक्त असा आणि सर्व बाजूंनी तेजाचा पुंज, प्रकाशमान, प्रज्वलित अग्नी व सूर्याप्रमाणे कांतिमान, डोळे दिपवणारा असीम, अपार असा तू मला जिकडे तिकडे दिसतो आहेस. असे अर्जुन म्हणतो आहे. म्हणजे भगवान श्रीकृष्णाचेच विराट रुपात दर्शन त्यास सर्वत्र दिसत होते, वर, खाली, आजुबाजूला तोंड फिरवले तरी तिकडे सुद्धा, भीतीने डोळे मिटले तरीही दर्शन होतच होते.

या विराट, विलक्षण साक्षात्काराने अर्जुन भांबावून गेला आणि उद्गारला 'अरेच्या! परमात्मा ज्याला म्हणतात ते हेच स्वरुप काय! हे अपूर्व दर्शन पाहून तो म्हणाला, 'हे भगवंता आपणच 'परम धाम', 'परम अक्षर', अविनाशी सनातन पुरुष आहात असे मला वाटते. हे अक्षण तत्व (परम अक्षर) म्हणजेच 'प्राण' म्हणजेच 'तालयुक्त गती' म्हणजेच स्पंदन. हे स्पंदनात्मक तत्व साऱ्या सृष्टीत दिसून येते. म्हणूनच 'परम अक्षर' याचसाठी म्हटले जाते की परमात्मा सर्वत्र आहे. (प्रत्येक वस्तुजाताचे अंत:स्वरुप स्पंदनात्मक आहे हे आता विज्ञानानेही सिद्ध केले आहेच. प्रत्येक वस्तू अणू परमाणू रुप आहे. अणूचे अंतरंग विद्युत कणांचे असून ते कमालीचे गतिमान आहेत.) या स्पंदन गतीलाच 'अक्षर' असा वैदिक प्राचीन शब्द आहे. हे अक्षर तत्व स्पंदनात्मक व ज्ञानयुक्त आहे. म्हणनूच ब्रह्म ज्ञानयुक्त आहे. या अक्षर तत्वामुळे काही 'शाश्वत धर्म' ही निर्माण होतात. शाश्वत धर्म म्हणजे विश्वव्यापक नियमबद्धता. विश्व कमालीचे नियमबद्ध आहे. त्या नियमांचे पालन करावेच लागते. परमात्माच या 'शाश्वत धर्माचा' रक्षणकर्ता आहे. जो नियम एका ठिकाणी लागू होतो तो सर्वत्र सापडतो म्हणून गुरुत्वाकर्षणाचा विश्वव्यापक ('शाश्वत धर्मा'चा) शोध लागतो.

अर्जुन विश्वरुपाचे दर्शन घेता घेता म्हणतोय 'हे भगवंता तू आदी-मध्य अंतरहित व अनंत आहेस. तुझे बाहू अनंत आहेत अनेक चंद्र-सूर्य तुझे नेत्र आहेत. मुख्य म्हणजे प्रदीप्त अग्निच. तू आपल्या अलौकिक तेजाने सारे विश्व प्रकाशित करीत आहेस अशा तुला मी पहात आहे. सारे विश्व परमात्म्याचा प्रकाश आहे. म्हणनूच त्याला त्वं

अग्निः, त्वं रुद्रः त्वं भानुः, त्वं चंद्रमा त्वं ब्रह्मभुर्भूर्वस्वरोम् । असे म्हटले आहे. अर्जुन पुढे वर्णन करतोय 'स्वर्ग व पृथ्वी याच्या मधले अंतर तू एकट्यानेच भरून टाकले आहेस. सर्व दिशाही तूच व्यापल्या आहेस. तुझे अद्‌भूत व रौद्र रुप पाहून तिन्ही लोक चकित होत आहेत. परमात्म्याचे संमग्र रुप प्रकट होणे हे सहन होणारे नाही. कारण अग्नित टाकले की सारे अग्निरुप होऊन जाते. अर्जुनाला हा साक्षात्कार झाला. तो म्हणतो, 'हे भगवंता, हे सर्व देवांचे समूह आपणामधेच प्रवेश करत आहेत. कित्येक देव हात जोडून आपली प्रार्थना करीत आहेत. सिद्ध, ऋषि महर्षी जगताचे कल्याण असो, अशी आपली प्रार्थना करीत आहेत आणि आपली स्तुती स्तोत्रे गात आहेत. आपले व जगताचे अस्तित्व या भगवत् रुपात संपत आलेले पाहून देव, ऋषी भगवंताची स्तुती करू लागले. प्रार्थना करू लागले. हे सारे भीतीपोटी हात जोडून पुन्हा पुन्हा वंदन करू लागले. हे भगवंता 'रुद्र, आदित्य, वसू, अश्विनीकुमार, वायू देवता, यक्ष, गंधर्व, असूर तसेच सारे सिद्धांचे संघ तुझ्या या 'विश्व-विलय' रुपाला पाहून विस्मयचकित होऊन तुझ्याकडे सारे भयभीत होऊन पहात आहेत.

देव-देवतांच्या शक्ति-माध्यमातूनच हे विश्वचक्र भगवंत चालवीत असतो. त्या सर्वांना आश्चर्य वाटत आहे की, परमात्मा का कोपला आहे म्हणून आपल्या समग्र रुपाने प्रकट होऊन हा अग्नी प्रलय करीत आहे? परमात्म्याचा यात काय हेतू आहे? आपले हे अनेक मुखे, अनेक उदरे, अनेक नेत्र, बाहू, मांड्या, पाय तसेच विक्राळ दंत-दाढा असलेले रुप पाहून सर्व लोक व्याकुळ झाले आहेत. माझीही स्थिती तशीच झालेली आहे. कारण आकाशाला भिडलेले आपले दैदिप्यमान अग्निचेच मुख व सर्वांग असलेले रुप पाहून माझे धैर्य गळाले आहे, शांती ढळली आहे. अंत:करण भयाने व्याकुळ झाले आहे.

तुझे अक्राळ विक्राळ रुप पाहून मला दिशा समजेनाशा झाल्या आहेत. मी कोण, कुठे आहे हे समजेनासे झाले आहे. सारे सुखशांती, समाधान हरवून गेले आहे, करपून गेले आहे. सारे विश्व ज्वालांच्या लकलकत्या हातांनी कवटाळतो आहेस. भगवंता तुझे समग्र रुपात प्रगट होणे किती उग्र भयानक आहे ! समग्र परमात्मा प्रकट होणे म्हणजे समग्र विश्वाचे चिद्‌रुपात रुपांतर (चैतन्यात रुपांतर) होणे ! शत्रू समोर तो भीत नव्हता त्याला आपल्या सामर्थ्याने जिंकू हा आत्मविश्वास त्याच्यात एरव्ही होता. पण इथे अस्तित्वाचा काहीच अर्थ नाही: विश्वाचाच विलय होतोय तिथे आपले काय ! या कल्पनेने तो हबकला. 'मी' स्वत: 'मी' समजत होतो. माझे जीवन, माझे ज्ञान, माझे सामर्थ्य, माझे भाऊ, माझे राज्य अशी 'मी'पणाची धुंदी खाड्कन उतरली. आगीत कवठ ताड्कन फुटावे, तसा त्याचा 'अहंकार' काड्कन फुटून गेला. या विराट विश्वात आपल्या 'मी'ला काय किंमत आहे? 'मी' त्यापुढे किती क्षुद्र आहे हे त्याला कळून चुकले. त्यामुळे अर्जुन अहंकारशून्य झाला.

अर्जुनाला विश्वरुप दर्शन दाखवण्याचा भगवंताचा हाच हेतू होता. 'अहंकाराचे' विश्वरुपात विसर्जन आणि तो साध्य झाला होता. 'देवा प्रसन्न हो' माझे व जगताचे अस्तित्व राहू दे ! बाबा रे माझे स्वतंत्र अस्तित्व संपवू नकोस. (इथे भक्त व भगवंत असे द्वैत राहून दोघांमध्ये भक्तीने अद्वैत होऊ दे ही ज्ञानेश्वरांनी मांडलेली विचारसरणीच अर्जुनाला अभिप्रेत आहे.) मला तद्रुपता नको. 'मी' तूच पूर्णपणे झालो तर मी भगवंताचे रुप कसे पाहणार ? त्याची भक्ती कशी करणार? म्हणून द्वैतातून अद्वैत हीच कल्पना. 'अद्वैती' ती नसे आम्हासी गोडी' असे तुकाराम महाराज म्हणतात. तुझे गुणगान करायला पुन्हा पुन्हा जन्माला घाल. 'तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।' असे तुकाराम महाराज म्हणतात. मला तर दिसते आहेकी, 'हे सर्व धृतराष्ट्र पुत्र, राजांचे समुदाय, पितामह भीष्म, द्रोणाचार्य, कर्ण आमच्या सैन्यातील योद्धे सगळेच तुझ्या भयंकर पसरलेल्या अग्नीच्या मुखात वेगाने घुसत आहेत. विक्राळ दाढांखाली त्यांची

मस्तके कडाकड रगडली जात आहेत. जसे नदीचे प्रवाह सागराला मिळायला धाव घेतात. पतंग ज्योतीवर झेपावतात व जळून खाक होतात. तसेच हे लोक आपल्या विनाशाकडे मृत्यू मुखात दौडत निघाले आहेत. या ज्वाळांचा उग्र प्रकाश साऱ्या जगतालाच वेढीत ओढीत आहे.

या दृश्याने अर्जुनाला हे कळून चुकले की आपल्या 'मी'ला जीवनाला कर्तृत्वाला, पराक्रमाला, अहंकाराला कशा कशालाच काहीच अर्थ नाही. हे युद्धरुप कर्म ही अर्थशून्य आहे. विश्वरुपात या सर्व योद्ध्यांचा युद्धाविना विनाश होतोय त्याने प्रत्यक्ष पाहिले. हे असे का आणि कसे घडत आहे हे मात्र त्याला कळेना. म्हणून तो भगवंताला विचारतोय -

भगवंता एवढे उग्र, भयानक रुप धारण केलेले आपण आहात तरी कोण? आपले असे उग्र रौद्र रुप का आहे? यामागचा हेतू काय? मला काहीच समजेनासे, कळेनासे झालेय. मी आपल्याला प्रणिपात करतो आपण प्रसन्न व्हा. आपण आदि अनादी अनंत आहात.

यावर भगवंताने उत्तर दिले, 'मीच सर्वांचा विनाश करणारा काळ आहे. हे सैन्य आपल्या मरणाने मरणारच आहे. मी त्या सर्वांचा नाश करण्यासाठीच प्रवृत्त झालोय. तू युद्ध कर किंवा करू नकोस हे विनाश पावणारच आहेत. म्हणून म्हणतोय उठ ! युद्ध करून शत्रुंना जिंकून समृद्ध राज्याचा स्वामी हो. उपभोग घे. हे सारे योद्धे मी आधीच ठार मारलेत. तू फक्त हे सव्यसाची अर्जुना निमित्त मात्र हो. (सव्यसाची म्हणजे दोन्ही हातांनी बाण मारणारा, मीच महाकाल आहे. जिथे सृष्टी तिथे संहार असणारच व तो उग्र आणि तितकाच भयानकही असणारच व वाटणारही. काळाच्या मुखातून कोणी कधी सुटले आहे काय? कारण काळ म्हणजे गती. काळ गतीने साऱ्यांचा मृत्यू ठरलेलाच आहे. तेव्हा तू युद्ध केले नाहीस. तरी यांचे जीवन आता संपलेलेच आहे. मग अर्जुना, 'मी मारणारा', 'मी ठार करणारा', असा अहंकार तुला असण्याचे कारणच नाही. 'मी कर्म करतो' असे तुला वाटते म्हणून तुला पाप-पुण्याचा स्पर्श होतो व कर्मबंधन प्राप्त होते. खरे तर सारे विश्व परमात्म्याच्या मर्जीने चालते, सामर्थ्याने चालते. तू असलास वा नसलास तरी हे विश्व असेच चालणार आहे. तेव्हा 'मी करतो' हा अहंकार कशाला? ती विश्वचालक शक्ती सारे कर्म करीत आहे. त्या शक्तीला हा संहार अभिप्रेत आहे. ती शक्ती 'काल' आहे. त्या काल शक्तीने ही जीवने संपवलेलीच आहेत. ही केवळ बुजगावणी ठरली आहेत. कठपुतळीच्या बाहुलया नाचविणारा भगवंत पडद्यामागे उभा आहे. ज्याच्या दोऱ्या तुटल्या त्या बाहुल्या निर्जीव झाल्या आहेत कोणी जरा ढकलले की त्या पडतील. म्हणून हे श्रेय तू मिळव. त्यासाठी उठ आणि युद्ध कर. विजय तुझाच आहे. ही विश्वचालक शक्तीच तुझ्यातून कार्य करीत आहे हे तू तरच अनुभवशील, जर तू अहंशून्य झालास. (चैतन्य जड ते प्रगट होऊन कार्य करू शकते ते तुझ्यात अवतरले आहे) ती विश्वशक्तीचे कार्य करणार आहे तू निमित्तमात्र आहेस, हे लक्षात घेऊन अहंकार सोड. काम-क्रोध रहित हो. तुझा अहंकार परमात्म स्वरुपात तादात्म्य पावू दे. म्हणजे 'मी' शूर वीर योद्धा आहे, 'मी' ठार मारीन. 'मला' पाप लागेल, 'मला' काय फायदा? 'मला' रक्तलांच्छित राज्य नको. या सर्व वक्तव्यातील 'मी' जर परमात्म शक्तीत विलीन झाला तर तुझ्या हातून काळशक्तीच कार्य करीत आहे असे अनुभवशील. अहंकार स्थळकाळात कार्य करतो. अहंकार संपला तर कर्मांना विश्वव्यापक गतीचे स्वरुप येते.

परमात्मा 'शाश्वत धर्माचे पालन' करणारा आहे. आपणही आपला स्वधर्म त्या धर्माशी सुसंगत ठेवायला हवा. आपल्या वागण्यातून आपणही हा शाश्वत धर्म म्हणजे चिरंतन टिकणारी नियमबद्धता, प्रगट करणे म्हणजेच निरहंकार होणे. तुझा स्वधर्म आता 'युद्ध करणे' हाच आहे तेव्हा त्यात कोणाचा जय होणार कोण मरणार याचा विचार तुला करण्याचे काहीच कारण नाही. तू निमित्तमात्र आहेस.

विश्व निर्माता, विश्व चालक, पालक ही भगवंताची


रुपे सुखवणारी, आनंददायी आहेत पण तोच विश्वसंहार आहे व हे त्याचे रुप भीषण आहे. शिवही तोच आहे तोच रुद्रही आहे. 'शाश्वत धर्माचे रक्षणासाठी' तो उग्ररुप धारण करून अधर्माने वागणाऱ्यांचे पारिपत्य करण्यासाठी तो नियत्ताय. संहारक शस्त्र म्हणून तो तुझा वापर करणार आहे, एवढे तू लक्षात ठेव.

भगवंताचे हे बोलणे ऐकून व त्याचे उग्र, संहारक कालस्वरुप पाहून, अर्जुन गर्भगळित झाला, थरथर कापू लागला, तोंडातून शब्दही फुटेना. तो पुन: पुन्हा नमस्कार करू लागला. (सुसाट वादळ, मुसळधार पाऊस, विजांचा कडकडाट, चमचमाट, समुद्राच्या खवळलेल्या उत्तुंग लाटा पाहून धरणीकंप, उल्कापात वगैरे पाहून आपणही असेच गर्भगळित, असहाय्य होतो ना!) ३६ ते ४६ श्लोकात अर्जुनाने आरंभलेली स्तुती व प्रार्थना आहे.

अर्जुन भगवंताची स्तुती आणि प्रार्थना करु लागला. 'हे प्रभो !, हे हृषिकेशा तुझ्या नाम संकीर्तनाने सारे जग आनंदित होते. तुझ्या ठिकाणी अनुरक्त होते. राक्षस भिऊन दशदिशांना पळू लागतात. सिद्ध पुरुषांचे समूह तुला वंदन करतात. हे अनंता, देवाधिदेवा, जगन्निवासा ज्याअर्थी सद् असद् आणि व्यक्ताव्यक्त पलिकडचे जे अविनाशी तत्व तेही तूच आहेस. म्हणून सर्व श्रेष्ठ व ब्रह्मदेवाचाही आदिकर्ता असा जो तू त्या तुला ते का नमस्कार करणार नाहीत? अर्जुनाला परमात्म्याचा साक्षात्कार होत आहे त्यामुळे त्याच्या तोंडून उत्स्फूर्तपणे 'वेद' (ज्ञान) प्रगट होत आहेत. त्या साक्षात्काराच्या अनुभूतीतून तो परमात्म्याचे स्वरुप, विश्वस्वरुप व विश्वप्रक्रिया स्पष्ट करत आहे. 'तू ब्रह्मदेवाचा आदिकर्ता. ब्रह्मदेव म्हणजे भगवंताचा आदिसंकल्प. 'एकोऽहं बहुस्याम' हे भगवंताच्या हृदयातले स्फुरण यासच ब्रह्मदेव म्हणतात. हे स्फुरण परमात्म्याच्या हृदयात झाले. त्याने प्रथम अहमूची आहुती दिली व तो 'बहुस्याम' झाला. ज्ञानी लोक या आदिपुरुषास, अक्षर पुरुषास नमस्कार करतात.

परमात्म्याने सृष्टी निर्माण केली व त्यात प्रवेश केला, असे उपनिषद सांगते 'ईशावास्यमिदं सर्वम ते समुद्र हा लाटांत आश्रय, सुवर्ण अलंकाराचा आश्रय व परमात्मा हा विश्वाचा आश्रय. निरनिराळ्या गुणधर्मांच्या व विविध आकाराच्या विद्युत उपकरणात उदा. पंखा, दिवा, फ्रीज, टी.व्ही. मिक्सर, वॉशिंग मशीन इ. यात वीजेने प्रवेश करावा व ती कार्यरत व्हावी तसाच भगवंत सृष्टीत प्रवेश करतो. (सर्वात चैतन्य तत्व प्रवेश करते.) विद्युत शक्ती ही ज्ञानशून्य आहे. परमात्म शक्ती ही ज्ञानपूर्ण, 'स्व-संवेद्य' (त्याला स्वत:च स्वत:ची जाणीव आहे) आहे.

आत्मा व परमात्मा यातील अंतर ध्यानी येण्यासाठी उदाहरण पाहूया. संपूर्ण विश्व हा विराट वृक्ष. वृक्षाचा आरंभ - बीजातून वृक्षाचा विकास - फळात पुन्हा बी. जेथून प्रारंभ तेथेच शेवट. म्हणजे कसा तो बघा.




म्हणून ज्ञानेश्वर माऊलींने 'अमृतानुभावात' म्हटले आहे की, 'प्रकृतीच्या अंती शिवूचि भेटे' परमात्माच आदिमा व अंतिमा आहे. म्हणून अर्जुन हे जाणून म्हणतो. 'आपणच आदिदेव सनातन पुरुष आहात. जगताचे परमधाम आहात. आपण जाणते आहात व जाणावयास योग्यही आहात हे अंनतरुपा साऱ्या विश्वात आपणच ओतप्रत भरलेले आहात ! तू अंनत रुपाने विश्वात नटला आहेस. तूच वायू, यम, अग्नि, वरूण, चंद्रमा, प्रजापती (ब्रह्मदेव) व त्यांचाही पिता आहेस.

अर्जुनाने सांगितलेल्या या परमात्म्याच्या शक्ती आहेत. त्या शक्तींना वेदांनी देवता म्हटले आहे. वायू म्हणजे हवा नाही. वायू सुटला की घर्षणाने विद्युत निर्माण होते. हवा वाहत नाही. म्हणून वायू म्हणजे विद्युत लहरी. यम-

नियमन शक्ती सारे विश्व यमपाशात अडकलेले आहे. यमाला धर्मही म्हणतात. यम-नियम-धर्म, अग्नि-उष्णता, वरूण-वर्षा देवता, चंद्रमा-मानस देवता, प्रजापती - संकल्प देवता.

अर्जुन पुन:पुन्हा भगवंताला म्हणू लागला, 'भगवंता तुला सहस्त्रश: नमस्कार असो. पुन: पुन्हा नमस्कार असो. मागून पुढून, साऱ्या बाजुंनी नमस्कार असो. (कारण तुझे तोंड व पाठ कुठे आहे कळतच नाही?) तू असीम सामर्थ्यशाली, अनंत पराक्रमी, विश्वव्यापक, सर्वेश्वर सर्वात्मक आहेस. 'श्रीकृष्ण' या 'रुपात मी तुला पाहिले तरी परमात्मा म्हणून तुला ओळखले नाही. तू महात्मा आहेस एवढेच माहीत होते. एवढा विराट विश्वरुप परमात्मा 'श्रीकृष्ण' रुपात अवतरु शकेल ही शंकाही मनाला कधी शिवली नाही. तू अलौकिक पुरुष आहेस एवढेच जाणले. तुला नारद व व्यास हे महर्षी 'परमात्मा' म्हणत होते पण माझ्या दृष्टीने परमात्मा म्हणजे असामान्य शक्तीशाली पुरुष आणि बुद्धिमान पुरुष एवढाच होता. त्यामुळे 'निराकारता साकारता', 'व्यापकता मर्यादा' असले प्रश्न मला पडले नाहीत. तुला 'पूर्णावतार' म्हणून मी जाणले नाही तुला मी बरोबरीचा समजून प्रेमाने प्रमाद केले. तुला मी मित्र समजून थट्टा मस्करीही केली. तुझा अपमानही केला आता तुझे परमेश्वरी स्वरुप जाणल्यावर मला पश्चाताप होत आहे माझ्या वर्तनाचा. त्याबद्दल मी क्षमा मागतो. एक बुद्धिमान मित्र या पलीकडे त्याचे विभूतितत्व अर्जुनाला जाणवले नाही. असेच होते. परमात्मा अवतार घेतो त्यावेळी त्याचे विभुतीतत्व जाणवत नाही. शिवाजी महाराजांसारख्या विभूतिमत्वाचे अलौकिकत्व त्यांच्या राण्यांना, मुलांना तरी कुठे जाणवले? ओळखू आले? अर्जुनाला, त्या विराट परमात्म्याने आपली चेष्टा, मस्करी, अपमानास्पद बोलणी सहन केली. हे मनात येऊन त्याने भगवंताची मनोमन क्षमा मागितली. आता ते अलौकिकत्व ध्यानात आल्यामुळे तो म्हणू लागला की 'आपणच या चराचराचे पिता आहा. श्रेष्ठतम गुरु, पूजनीय व वंदनीय आहात. तिन्ही लोकात आपणा समान कोणी नाही. हे देवा पिता-पुत्राचे, मित्र-मित्राचे अपराध सहन करतो, पती-पत्नीचे अपराध सहन करतो, तसे आपणही माझे अपराध पोटात घाला. भगवंता आपले हे विराट रुप मी पूर्वी कधीही पाहिले नव्हते. त्यामुळे एकीकडे ते पहायला मिळाले म्हणून हर्ष होत आहे तर दुसरीकडे भीतीने मी व्याकुळ झालो आहे. उंच डोंगरावरून कोसळणाऱ्या प्रपाताचे सौंदर्य जाणवून मन हर्षित ही होते नि खोल दरीत कोसळणारे पाणी बघून डोळे फिरतातही (एकाचवेळी हर्ष व भय निर्माण करणाऱ्या विराट रुपास 'दिव्य' म्हणावे.) भगवंताचे विराट रुप असेच दिव्य होते. तप्त कांचन व मध्यान्हीचा सूर्य सुंदर खराच पण डोळे मिटायला लावतो. तसेच भगवंताचे दिव्य विराट रुप पाहून अर्जुनाला झाले म्हणून तो म्हणाला - देवा, मी तुम्हाला पूर्वीच्या चतुर्भुज रुपात पाहू इच्छितो. मस्तकावर मुकुट, एका हातात गदा, दुसऱ्या हातात चक्र असे रुपच मला दाखवा. हा विराट एकतेचा अनुभव घेतल्यावर पुन: सौम्य सगुण-साकार रुपाचा आग्रह अर्जुनाने धरला. पुनश्च ते 'हरिरुपच' दाखवा, असे तो पुन: पुन्हा विनवू लागला.

विश्वरुपदर्शनानंतर अर्जुनाची मनस्थिती कशी झाली पहा -

उगवणाऱ्या सूर्यासारखं जग सारं उजळत गेलं ।
गर्भ रेशमी जरतारी पातळ कोणी उलगडत गेलं ॥
बीजापोटी झाड मोठं गगनावरी चढत गेलं ।
तसं तुझं विश्वरुप विश्व व्यापून उरत गेलं ॥
तुझे तुला लखाभ असो विश्वबंध विश्वरुप ।
मला मात्र आहे तुझ्या मानव रुपाचंच अप्रूप ॥
वेडा समज शहाणा समज काही समज मला ।
घाबरून गेलो देवा तुझ्या विराट स्वरुपाला ॥
प्रेमळ माता जोजवणारी मात बाळकाला ।
रौद्र रुप धरता ती कापे तो चळचळा ॥
काय वाचिली म्या गीता पुढे 'गावढियाँ' ।

खचितच वाटलेले मनाला तुझिया ॥
योग्यांना अन वेदांनाही दुर्मिळ असं विश्वरुप ।
दावलं परी भावलं मला तुझं तेच सगुण रुप ॥
उलगडलेल्या वस्त्राचे का घडीत मोल कमी ठरते ? ।
डेरेदार वृक्षाचे का बीजात मोल कमी भरते ? ॥
विश्वरुप तूच आहेस, सगुणही तूच आहेस ।
विश्वरुपा परीसे देवा सगुण तू लोभस आहेस ॥
मी तुझा लाडका, देवा रागवू नकोस माझ्यावर ।
विराट रुपातून आता सौम्य रुप धारण कर ॥

भगवंताने त्याची विनंती मान्य केली. भगवान श्रीकृष्ण म्हणाले, 'अर्जुना ! मी तुझ्यावर अनुग्रह केला आणि आपल्या योग शक्तीने अत्यंत तेजोमय असे आणि विश्वाचे आदि असणारे विराट रुप तुला दाखवले. अरे हे विराट रुप तुझ्यावाचून पूर्वी कोणक्ष पाहिलेले नाही. वेदाध्ययनाने, यज्ञांनी, दानाने, उत्कृष्ट कर्मानि वा उग्र तपानेही कोणाला तुझ्यावाचून दर्शन दिलेले नाही. पण अर्जुना घाबरू नकोस. प्रसन्न मनाने माझे शंख, चक्र, गदा, पद्मधारी, चतुर्भुज रुप पुन: पहा.

वेदाध्ययन, यज्ञ, दान, तप इत्यादींनी साक्षात्कार होतो परंतु त्याची बरोबरी अर्जुनाच्या साक्षात्काराशी होऊ शकणारी नाही. नारद, प्रल्हाद, ऋषी इत्यादींना भगवंताचे दर्शन झाले होते पण साक्षात्काराचे सोपान व त्यांच्या पायऱ्या अनेक असतात हे ज्ञात असले पाहिजे.

संजय म्हणतो, भगवंताने असे म्हणून अर्जुनाला पुन्हा पूर्वीचे चतुर्भुज रुप दाखवले व अर्जुन भानावर आला त्याला धीर आला. त्याचे चित्त ठिकाणावर आले.

भगवंताने अर्जुनाला विश्वरुपाचे दर्शन घेताना सांगितले की तू माझ्या ठिकाणी भूते पाहू नकोस तर ती माझे योगेश्वैर्य म्हणून पहा, असे म्हटले म्हणजे विश्वाचे वास्तविक रुप दाखवले. अक्षय तत्त्वाचे प्रत्यक्ष, रुप दाखवले. ते अर्जुनाने पाहिले. विश्वाच्या प्रत्यक्ष दर्शनात 'पुरुष तत्व', आत्म तत्व लोप पावलेले किंवा झाकलेले असते. योग मायेच्या आवरणाने आतील 'अक्षर पुरुष' दिसत नाही. दिव्य दृष्टीने ते दिसते. विश्वरुप दर्शन म्हणजे अक्षर अशा परम पुरुषाचे दर्शन. यात प्रकृती ही सुद्धा तेजोमयी त्याच अक्षर स्वरुपाचीच बनलेली दिसते. तीही त्याच प्रकाशाची आहे, याचे दर्शन होते. यात विश्वाच्या जड स्वरुपाचा लोप होतो. आपले जीवन म्हणजे परमात्म्याचे सौम्य दर्शनच होय. या रुपानेच रसास्वाद घेता येतो. विश्वरुप म्हणजे वाऱ्यासवे धावणे, गगनाला आलिंगन देणे होय. प्रवास जगभर केल्यावर आपल्या छोट्या घरीच बरे वाटते. तसे विश्वरुप दर्शन घेतल्यावर सौम्य चतुर्भुज रुपाच्या घरात राहणेच आनंददायक वाटले अर्जुनाला.

विश्वरुप दर्शनाची इच्छा अर्जुनानेच व्यक्त केली, पण तेव्हा ते दिव्य रुप इतके दाहक असेल अशी त्यास कल्पना नसेल.त्याची इच्छा भगवंतानी पुरी केली. पण जो परमेश्वर विराट विश्वात भरून राहिला आहे तो संपूर्ण तसाच्या तसा लहान मूर्तीत, मातीच्या कणांतही आहे. अमृताच्या सिंधूत जी गोडी तीच अमृताच्या बिंदूतही असते. लहानशा स्वरुपात सुद्धा तो अनंत परमेश्वर साराच्या सारा साठवलेला आहे. छोटा फोटो व मोठा फोटो यात काय फरक? पासपोर्ट साईज फोटो व एनलार्ज फोटो सारखेच. जे मोठ्यात ते तसेच्या तसे छोट्या फोटोत. लहान टाईपात अक्षरे असली तरी अर्थ तोच, मोठ्या टाईपात असली तरी अर्थ तोच. मोठ्या टाईपात मोठा अर्थ व छोट्यात छोटा असे काही नाही. याच विचार पद्धतीचा आधार मूर्तीपूजेला असतो. लहानशा वस्तूत सर्व विश्व अनुभवण्यास शिकणे म्हणजे मूर्तीपूजा. सर्व सृष्टी कणाकणात आहे. माझ्यात जो परमेश्वर आहे, तोच सर्व वस्तूंत आहे. प्रेमाचा संबंध जोडू लागा म्हणजे अनंत सृष्टीतील परमात्मा अणुरेणुतही दिसू लागेल. एकदा ही दृष्टी आली की मग आणखी काय हवे ! यासाठी इंद्रियांना वळण लावले पाहिजे. भोगवासना सुटून प्रेमाची पवित्र दृष्टी आली पाहिजे. मग प्रत्येक वस्तूत ईश्वर

दिसेल.

ईश्वरी रुप प्रत्येक वस्तूत ओतप्रत भरलेले आहे त्यासाठी विराट दर्शनाची आवश्यकता नाही. शिवाय ते विराट दर्शन मानवाला सहन होणारे, पेलणारे नाही. म्हणून विराट विश्वरुपाची इच्छा करू नका, असेच स्वानुभवाने अर्जुन सांगत आहे. विराट विश्वरुप प्रगट होणे म्हणजे विश्वाचा विलय. ईश्वर तिन्ही काळी तिन्ही स्थळी व्यापून राहिला आहे तेच बरे. तो धगधगीत गोळा होऊन माझ्यासमोर आला तर माझे विश्वाचे काय होईल. एका सूर्याचे तेज (उष्णता) आम्हाला सहन होत नाही मग सहस्त्र सूर्य एकदम प्रगटले तर विश्व वितळून जाईल. आकाशातल्या तारका दूर आहेत त्या तिथेच असू देत जवळ आल्या तर त्या जळती आग आहेत. ईश्वराची ब्रह्मांडे जेथे आहेत तिथे तशीच असू देत. भूतकाळ आठवत नाही पुढचे कळत नाही तेच हिताचे आहे. जग जसे आहे तसेच मंगल आहे. काही वस्तूंची सलगी करावी, काहीपासून दूरच रहावे. विनोबाजी म्हणतात. गुरुला आदराने नम्रतेने वंदन करून दूर बसावे. आईच्या मांडीवर लोळावे. फुले जवळ घ्यावी अग्नी दूर ठेवावा.

विराट विश्वरुप अर्जुनाला भावले नाही म्हणून भगवंताने त्याला दोष दिला, असा साक्षात्कार देवांनाही दुर्लभ. तो तुला झाला. ज्ञानाने, दानाने, ध्यानाने, तपाने, यज्ञानेही माझे समग्र ज्ञान तेजाचे निखळ दर्शन शक्य नाही. तुला ते झाले तेही विनासायास. तसा तू भाग्यवानच. पण तुला सांगतो ते ध्यानात ठेव. माझ्या विश्वरुपावर ध्यान केंद्रित कर व सगुण साकाराची भक्ती कर. तीही श्रेष्ठच आहे. ५५ व्या शेवटच्या श्लोकात भगवंत म्हणतात, अर्जुना जो माझी म्हणजे परमेश्वराची म्हणून सर्व कर्मे करतो, मत्परायण राहतो, माझी भक्ती करतो. आसक्तीरहित राहून कोणाशीच वैर करीत नाही, तो मला येऊन मिळतो. म्हणजेच अनन्य भक्तीने मला यथार्थपणे जाणणे, पाहणे शक्य आहे. माझ्या ठायी तत्वाने प्रवेश करणे शक्य आहे.

म्हणजे 'निराकार', 'व्यापक चैतन्य' हे जीवनाचे श्रेष्ठतम मूल्य आहे आणि अनन्य भक्तीही श्रेष्ठ आहे, असे भगवंत या अध्यायाच्या अखेरीस सांगतात. त्यामुळे पुढील बाराव्या अध्यायाच्या सुरवातीस अर्जुनाने प्रश्न केलाय 'निर्गुणाचे ध्यान की सगुणाची भक्ती' करणारे उत्तम योगवेत्ते? कोण सर्वश्रेष्ठ !

भगवंताने पूर्वीही असे बोलून अर्जुनाला संभ्रमित केले आहे आणि त्याचे निराकरणही केले आहे.

**आशा भिडे**

बी/९, विजय अपार्टमेंटस्, 'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२. दूरध्वनी : २५४१ ०१४०

## गीतेची आरती

जयदेवी जयदेवी जय भगवद्गीते । आरती ओवाळू तूज वेदमाते ॥ धृ ॥

सुखकारिणी दुखहारिणी जननी वेदांची । अगाध महिमा तुझा नेथेविस्वी ।
ते तू ब्रह्मी तल्लीन होसी ठायींची । अर्जूनाचे भावे प्रगटी मुखीची ॥ १ ॥

सातशते श्लोक व्यासोक्ती सार । अपटादशाध्ये इतुका विस्तार ।
एक अर्धपाद करता उच्चार । स्मरणमात्रे त्यांचा निरसे संसार ॥ २ ॥

काय तूझा पार वर्णू मी दीन । अनन्यभावे तुजला आलोनी शरण ।
सनाथ करी माते कृपा करून । बापरखुमादेवी -वरदा अभिमान ॥ ३ ॥

# भगवद्गीता - थोडक्यात

*श्रीमती आशा भिडे यांचे लेख वाचून गीतेवर चिंतन करणारे बरेच लेख 'दिशा'साठी येत आहेत. त्यापैकीच प्रत्येक अध्यायाचा थोडक्यात आशय सांगणारा एक लेख - संपादक*

हिंदु धर्म - हिंदू संस्कृती आणि हिंदू तत्वज्ञान यांचा महाप्राण साक्षात आत्मा म्हणजे श्रीमद्भगवद्गीता होय.

गीतेने प्रारंभापासून शेवटपर्यंत तीन प्रश्न चर्चेकरिता घेतले आहेत. पहिला प्रश्न दुःखापासून मुक्ती व सुखाची प्राप्ती. दुसरा प्रश्न पातकापासून निवृत्ती व पुण्य कर्माची प्राप्ती किंवा सदाचाराची प्रवृत्ती तिसरा प्रश्न कर्म निर्णयाचा. सुख व सदाचार साधण्याकरिता आणि दुःख दुराचार टाळण्याकरिता कर्मांची निवड कशी करावी. सुख - दुःख, पाप-पुण्य व कर्मांची निवड हे तीन प्रश्न प्रारंभापासून शेवटपर्यंत घेतले आहेत.

## 'योगस्थ कुरू कर्माणी'

योग वृत्तीने जगावे, कर्म करावे, योगवृत्ती साध्य करण्याकरिता गीतेने तीन साधने सांगितली आहेत, कर्म, ज्ञान, व ध्यान, भक्ती हा ध्यानाचाच पोटभेद आहे. गीतेच्या १८ अध्यायाचे ६ अध्यायांचा एक असे तीन विभाग केले तर पहिल्या सहा अध्यायात योग आणि सांख्य तुलना दुसऱ्या सहा अध्यायाला ईश्वर व भक्ती यांचा विस्तार व तिसऱ्या सहा अध्यायात मानव त्याचा स्वभाव व त्याचे जीवन या विषयांचा संपूर्ण गीतेमध्ये विस्तार झाला आहे.

गीता ही केवळ भारतीय तत्वज्ञानच नव्हे तर वैश्विक तत्वज्ञानाचा मुकुटमणी आहे. पर्वतात जसा हिमालय, पक्षात जसा गरूड, नक्षत्रात जसा चंद्र, ताऱ्यात जसा सूर्य, जलाशयात महासागर व्यापक पदार्थांत जसे आकाश, अवतारात जसे प्रभू रामचंद्र वा भगवान श्रीकृष्ण तशी तत्वज्ञानात केवळ गीताच ! असे तत्वज्ञान जगात दुसरे नाही. भगवान श्रीकृष्णांनी गीतेची अलौकिक थोरवी एका श्लोकात गीतेतच सांगितली आहे.

राज विद्या राजगुह्यं पवित्र मिदमुक्तमम्
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ ९.२ ॥

हे ज्ञान सर्व विद्यांचा राजा सर्व गुह्यांचा राजा अतिशय पवित्र प्रत्यक्ष फलदायी व धर्मयुक्त आहे. प्रत्येक मानवाला आत्मोन्नतीकडे नेणारे गीतेसारखे दुसरे साधन नाही.

गीता हे अध्यात्म शास्त्र आहे. गीता हे उपनिषद आहे. म्हणूनच गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी श्रीमद् भगवद्गीता । उपनिशत्सु असा उल्लेख आहे. ही गीता संसार जिंकणारे शास्त्र आहे. आत्म्याला प्रगट करणारा मंत्र आहे.

अर्जुनाला जो विषाद झाला त्यावरूनच गीता तत्वज्ञानाच्या अठरा अध्यायांची उभारणी झालेली आहे. कुठल्याही मनुष्याला सतावणारे प्रश्नच अर्जुनाच्या पुढे उभे राहिले आहेत. त्या प्रश्नांची उत्तरे भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला दिली आहेत. म्हणूनच हा कृष्णार्जुन संवाद अखिल मानव जातीत एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन व प्रकाश दाखवणारा ठरत आहे. जीवनातील प्रत्येक समस्येचे उत्तर देण्याचा सुरेख प्रयत्न गीता तत्वज्ञानाने केला आहे. जगातील सारे अध्यात्म मोठ्या कौशल्याने समाविष्ट करून भगवान व्यासांनी तो मानव जातीच्या हाती सुपूर्द केला आहे. प्रत्येक आध्यायाचा सारांश थोडक्यात पाहूया.

१. गीता त्रैलोक्य पावन करणारी आहे. अर्जुन स्वधर्मापासून ढळला आहे. स्वधर्माची जागृती त्याच्या अंत:करणामध्ये व्हावी म्हणून भगवंतांनी दुसऱ्या अध्यायापासून गीता सांगितली.

२. दुसऱ्या अध्यायामध्ये देहाचे क्षणभंगुरत्व व

आत्म्याचे अमरत्व, योगामुळे प्राप्त होणारे समत्व व ज्याला स्थितप्रज्ञाची स्थिती म्हणतो त्याचे निरुपण भगवंतांनी केले.

३. ही स्थितप्रज्ञता प्राप्त होण्यासाठी कर्मापासून प्रारंभ करावा लागतो म्हणून भगवंतांनी कर्मप्रधान योगाचा तिसरा अध्याय सांगितला. निष्काम कर्माची थोरवी भगवंतांनी सांगितली.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन (२.४७)

कर्मावर कर्त्याचा अधिकार नक्की आहे. फळावर त्याचा अधिकार नसावा. कर्मप्रधान योग कसा असावा ते कर्म कसे करावे, हे भगवंतानी तिसऱ्या अध्यायात सांगितले.

४. कर्मयोगाचे प्राचीनतत्व भगवंतानी चौथ्या अध्यायात उलगडले. आपणही सगुणावतार धारण करून निष्काम कर्मयोगच आचरतो हे भगवंतांनी सांगितले. मानवाचे प्रत्येक कार्य यज्ञस्वरूप झाले पाहिजे. ज्ञानासारखे दुसरे काहीही पवित्र नाही. आत्मज्ञान श्रद्धावंतालाच लाभते.

५. ज्ञानाने कर्मसंन्यास आणि योगाने निष्काम कर्म प्राप्त होते. कारण मानवाला कर्माशिवाय एक क्षणही राहता येत नाही.

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानम अवसादयेत् । ६.५
प्रत्येकाने आपला उद्धार करून घ्यावा.

६. मग त्याच्या साठी साधने कोणती? म्हणून ६व्या अध्यायात भगवंताने मार्ग कर्माचा असो, भक्तीचा असो, ध्यानाचा असो, किंवा ज्ञानाचा असो, कोणत्याही मार्गामध्ये तुम्हाला आतमसंयमन असल्याखेरीज परमात्म्याचे दर्शन होत नाही. ते दर्शन होण्यासाठी ६ व्या अध्यायात साधने सांगितली आहेत.

७. ७ व्या अध्यायापासून तत्पद उलगडायला भगवंतानी प्रारंभ केला. भक्तीचे निरूपण करताना भगवंतांनी निर्गुणमयी योगमाया अत्यंत दूरतर असल्याचे सांगून त्यांना भजणारे मायेला उल्लंघून जातात. भगवंताला श्रद्धेने अश्रद्धेने कोण भजतात, असे भक्तांचे चार प्रकार भगवंताने सांगितले आहेत. आर्त अर्थार्थी, जिज्ञासू आणि ज्ञानी असे चार प्रकारचे वर्णन ७ व्या अध्यायात केले आहे.

८. आता अर्जुन असा विलक्षण हुषार आहे की, त्याने तावडतोब प्रश्न विचारलेले आहेत, की अक्षर ब्रह्म कसे आहे ? या संज्ञा सांगण्यासाठी भगवंतांना मध्येच आठवा अध्याय अक्षरब्रह्म योग सांगावा लागला.

९. आणि पुन: एकदा भक्तीकडे वळून राजविद्या म्हणजेच आत्मविद्या राजगुह्ययोग त्यांनी सांगितला. ईश्वराचे ज्ञानी भक्त अखंड कीर्तनाद्वारे दृढव्रताने उपासना कशी करतात त्याचेही निरूपण केले. जो अनन्य भक्ती करतो त्याचा योगक्षेम भगवंतच चालवितात.

पत्रं पुष्पं फलतोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ॥ २६
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मन: ॥ २६ ॥

पत्र, पुष्प, फल, तोय, अत्यंन्त अंत:करणपूर्वक भगवंताला जर कुणी अर्पण केले तर त्यालासुद्धा भगवंत तीच उत्तमातली उत्तम गती देतो. भगवंत त्या भक्ताचा उद्धार करतात.

१०. भगवंताच्या विभूती विश्वाला कशा धारण करतात. हे भगवंतानी दहाव्या अध्यायात उलगडून दाखवले. त्यावरही अर्जुनाचे समाधान झाले नाही.

११. अर्जुनाला समग्रता हवी होती. म्हणून भगवंतानी त्याला विश्वरूप दाखविले. ते जगड्व्याल अक्राळ विक्राळ रूप पाहून नरवीर असून अर्जुन भ्याला आणि तो म्हणाला आपले सगुण साकार रूप आहे, तेच

मला दाखवा. तेव्हा भगवंतांनी आपले रूपआवरते घेतले पुन्हा चतुर्भुज सगुण रूप प्रकट केले.

१२. त्यासाठीच बाराव्या अध्यायाचा प्रस्ताव त्यांनी केला. भक्तीयोग सांगितलेला आहे. पण तो भक्तीयोग सांगत असताना बारावा अध्याय म्हणजे ज्ञानयोगाची ज्ञानकांडाची आदिच आहे.

१३. भक्तीयोग सांगताना ज्ञानोत्तर भक्तीचा आणि ज्ञानाचा सुद्धा प्रस्ताव भगवंतांनी केला मग आपल्या देहातले चैतन्य तत्व कळावे, म्हणून क्षेम-क्षेत्रज्ञ योग हा भगवंतानी १३ व्या अध्ययात उलगडून दाखविला.

१४. तो एकदा प्राप्त झाल्यावर ज्याच्यामुळेच क्षेत्रज्ञावे ज्ञान आपल्याला होते, तो गुणत्रयविभाग योग कसा आहे तो चौदाव्या अध्यायामध्ये समजावून सांगितला.

१५. पुरुषोत्तमयोग म्हणजे ज्ञानकांडाचा कळस आहे, हा संसाररुपी अश्वत्थ वृक्ष हा असंगाने निर्मोही होऊन आत्मज्ञानाची प्राप्ती करून घेऊन सर्व विद्यांमध्ये आत्मविद्या आत्मज्ञान हे खरे कसे असते त्या आत्मज्ञानाने क्षराक्षराच्या पलीकडचा पुरुषोत्तम कसा जाणावा, याचा उलगडा भगवंतांनी पुरूषोत्तम योगामध्ये केला. तिथे एका दृष्टीने ज्ञानकांडाची परिसमाप्ती झाली.

१६. आता अर्जुनाला आत्मविद्या प्राप्त होण्यासाठी दैवी संपत्ती वाढवावी लागते. त्याशिवाय मानवाला चैतन्य परब्रह्माचा साक्षात्कार होत नाही. आत्मप्रचीती येत नाही. म्हणून दैवी संपत्ती आणि आसुरी संपत्ती कशी असते, हे भगवंतांनी उलगडून दाखविले आणि सांगितले की,

''दैवी सम्पद्वि मोक्षाय निबन्धायासुरी मता ।

दैवी संपत्तीने मोक्ष मिळतो आणि आसुरी संपत्तीने जन्ममृत्यु चक्रामध्ये मनुष्य वारंवार बांधला जातो म्हणून दैवी संपत्तीचा उपयोग करावा, हे भगवंतांनी १६ व्या अध्यायात सांगितले आहे.

१७. दैवी संपत्तीचा पाया हा त्रिविध श्रद्धेचा कसा असतो आणि शास्त्राला प्रमाण करण्यासाठी श्रद्धेची जोड कशी असावी लागते, ती सात्विक श्रद्धा असली की आहाराने देहशुद्धी कशी करावी, यज्ञ म्हणजे केवळ आहुती देणे नव्हे, तर विश्वात्मक यज्ञ कसा असतो, त्याचे निरुपण भगवंतांनी केले, हा यज्ञ आपल्या लक्षात यावा, म्हणून सात्विक तप कसे करावे हेही भगवंतांनी उलगडून दाखवले आणि ज्या समाजाकडून ज्या राष्ट्राकडून आपण काही घेतलेले असते. त्यांना पुन्हा आपल्याला जे मिळाले ते सात्विक दानाने परत कसे करावे, त्याचा उलगडा भगवंतांनी १७ व्या अध्यायात केला आहे.

१८. भगवान श्रीकृष्णांनी दाखविलेल्या मार्गाने चालून आत्मोन्नती साधण्यातच मानवी जीवनाची इतिकर्तव्यता आहे. तोच खरा पुरुषार्थ आहे. तोच खरा धर्म आहे. भगवंतांच्या कृपाप्रसादाने आणि मानवाच्या निस्वार्थ, नि:स्पृह अखंड प्रयत्नाने अवघ्यांना त्याचा पारमार्थिक लाभ होवो, हीच जगन्नियंत्याच्या चरणी प्रार्थना !

**सौ. वैशाली फाटक**
शिवसमर्थ विद्यालय, ठाणे.

**लेख / वर्गणी / जाहिराती पाठविण्यासाठी पत्ता**

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**
दूरध्वनी : २५४२ ६२७०

# शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता

*शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता असावी का? अशी स्वायत्तता दिली तर काय परिणाम होतील याची चर्चा गेली काही वर्षे ऐरणीवरील विषयाप्रमाणे चालू आहे. यासंबंधात काही विचार या लेखात व्यक्त केलेले आहेत. - संपादक*

भारतीय लोकशाहीच्या गत ५५ वर्षांतील प्रवासामध्ये आपण नागरिक म्हणून आता थोडेसे प्रगल्भ होऊ लागलो आहोत, असे आता आपण म्हणू शकतो. गेल्या ५५ वर्षांमध्ये भारतातील शैक्षणिक संस्थांमध्ये स्वातंत्र्योत्तर भूमिकेमध्ये थोडी संभ्रमाचीच भूमिका होती. ब्रिटिशांनी हा देश सोडून जाताना इथल्या सुशिक्षित समाजाला काही 'आंग्ल' सवयींचे गुलाम बनवून ठेवले होते. या देशातील शिक्षण संस्थांची स्वातंत्र्याच्या वेळची स्थिती अत्यंत 'अनाकलनीय' होती. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांची सत्ता मान्य करून त्यांच्या सांगण्याप्रमाणे 'किंग अेडवर्ड'चा उदो उदो करीत गुलामीचे शिक्षण देणाऱ्या शाळा - धनाने, विद्यार्थ्यांनी व इंग्रज धार्जिण्यांनी उत्कर्ष पावल्या होत्या. चर्चेसला जोडून असलेल्या कॉन्व्हेंट शाळांना पैशाची तोसिस न पडल्याने समृद्ध होत्या तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रीयत्वाचे बाळकडू पाजणाऱ्या शाळा गरीब होत्या. त्यामध्ये शिकणारा विद्यार्थी हा राष्ट्रभावनेने चेतलेल्या भारतातील मध्यमवर्गाचा प्रतिनिधी होता. या शाळा त्यामुळे कमी शिक्षणसाधनांनी परंतु राष्ट्रनिष्ठांनी चालविल्या होत्या. समाजाला स्थैर्य देणारा समाज या शाळांपासून फटकूनच होता.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मात्र चित्र बदलले. भारतीय शाळांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. पण नवशिक्षित वर्गावरील संस्कारांनी शिक्षणाचे इंग्रजीकरण करून टाकले. एवढ्या वर्षाच्या पारतंत्र्यानंतर स्वतंत्र होणाऱ्या भारताने 'शिक्षण' या विषयाकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. स्वातंत्र्यकाळात झालेल्या फाळणीमुळे त्यानंतरच्या दंगलीमुळे नव्या रचनेमध्ये शिक्षणाबद्दल मूलगामी विचार करून परिवर्तन करण्यात आले नाही. इंग्रजांची शिक्षणपद्धती भारतामध्ये पक्की रुजली. इंग्रजी राज्यकारभार चालविण्याकरता लागणारे बाबू तयार करण्यासाठी भारतात लागू झालेल्या 'मॅकोले' पद्धतीच्या शिक्षणामुळे गुलम वा सेवक वृत्तीच्या जनशक्तीचा विकास झाला. मालक व्हावे - प्रचंड प्रगती करावी अशी उर्मीही हळूहळू दुर्मिळ होत गेली.

या पार्श्वभूमीवरच आपल्याला आपल्या शैक्षणिक संस्थांचे अस्तित्व शोधावे लागेल. भारताला स्वातंत्र्यानंतर थोडेफार स्थैर्य मिळाल्यावर समाजातील गुणांची अभिवृद्धी होऊन सरकारच्या पाठबळावर (म्हणजे सरकारी अनुदान, परंतु व्यवस्थापन मात्र स्थानिक सामाजिक संस्था अथवा ट्रस्टकडे) चालणाऱ्या अनुदानित संस्थांची घोडदौड वेगाने होऊ लागली. थोडीशी भविष्यकाळाची स्वप्ने पहाणाऱ्या काही प्रतिभावान संचालकांनी अनेक शाळा व संस्था दैदीप्यमान कर्तृत्वाने उजळून दाखविल्या. परंतु याच काळात स्थानिक स्वराज्य संस्थांनी म्हणजे महानगरपालिका नगरपालिका अथवा ग्रामपंचायतींनी चालवलेल्या शाळांची केवळ अधोगतीच झाली. अगदी थोड्या शाळा त्या त्या ठिकाणच्या समजूतदार व सुशिक्षित राजकारण्यांमुळे नावारुपाला आल्या. शैक्षणिक संस्थांमधील चर्चेसनी चालविलेल्या कॉन्व्हेंट स्कूल मात्र सूट, बूट, टायवाली आंग्लाळलेली व्यक्तिमत्व तयार करण्याचे कार्य करीत होती.

भारत मातेचे पूजन आहे म्हणून 'वंदे मातरम्' या स्फूर्तिदायक गीताचे - राष्ट्रभक्तीपर गीताचे उच्चार थांबवून - सर्वात्मका सर्वेश्वरा या कुसुमाग्रजांच्या लेखणीतून उतरलेली कविता नाकारून आपल्या सर्वधर्मसमभावाचा

झेंडा फडकत ठेवणाऱ्या स्वतंत्र भारताच्या सरकारने कॉन्व्हेंटमधून शिकवल्या जाणाऱ्या बायबल वर येशू ख्रिस्ताच्या वचनांवर कोणतीही मर्यादा न घालून शिक्षणाकडे पहाण्याचा दृष्टीकोन विकृत बनविला.

त्याच काळात उदय झाला तो विनाअनुदान शैक्षणिक संस्थांचा. तळागाळापर्यंत झालेली शैक्षणिक जागृती लक्षात घेऊन, शिक्षणाचे क्षेत्र हे उद्याचे 'मार्केट' आहे म्हणून मोठ्या संख्येने 'शिक्षणसम्राटांची' निर्मिती झाली व शिक्षणाचे 'मूल्य' वाढू लागले. आदर्श समाजनिर्मितीसाठी शिक्षणातून मूल्यवर्धन होण्याच्या ऐवजी शिक्षण घेण्याच्या मूल्याचेच वर्धन करण्यात आले. आता सर्वसामान्यांना शिक्षण घेण्यासाठी सर्वप्रथम विचार करायला लागणार आहे तो आपल्याला ही 'फी' परवडेल का याचा!

**स्वायत्ततेची कल्पना :-**

या पार्श्वभूमीवर आज स्वायत्ततेची कल्पना मांडण्यापूर्वी आपण जर आढावा घेतला तर निश्चितपणे असे म्हणावे लागेल की सरकारने चालविलेल्या 'मास एज्युकेशन' (सार्वत्रिक शिक्षण) देणाऱ्या संस्थाची कार्यक्षमता अत्यंत कमी आहे. अगदीच पर्याय नसेल तरच अत्यंत निम्नवर्गातील (आर्थिकदृष्ट्या) विद्यार्थी त्या संस्थांतून शिकतात - या उलट खाजगी संस्थांनी चालविलेल्या अनुदानित संस्था - सरकारी अधिक्षेप नसल्याने अधिक उत्तम रित्या चालल्या आहेत. संपूर्णत: खाजगी शाळाही उत्तम चालू आहेत. अजूनही भारतीय मनातील 'परीक्षा घेणारा' ही भूमिका पुसली न गेल्यामुळे या स्वतंत्र खाजगी शाळाही उत्तम विद्यार्थी तयार करतात. प्रचंड फी घेऊन - प्रचंड मेहनतही घेतात.

स्वायत्ततेची कल्पना ही यापुढील पायरी आहे. स्वायत्तता म्हणजे स्वातंत्र्य. सविकल्प स्वातंत्र्य - परीक्षा घेण्या न घेण्याचे स्वातंत्र्य, विषयांचे स्वातंत्र्य - सिलॅबसपासून स्वातंत्र्य. शाळांच्या आजच्या चौकटीबद्ध स्वरुपापासून स्वातंत्र्य - अनुभव व अनुभूतीतून प्रत्यक्ष शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य, शिक्षकांना शिकवण्याच्या विषयाचे, वेळेचे, माध्यमाचे स्वातंत्र्य, मुलांना शिकण्याचे, पाहिजे ते पाहिजे तेवढा वेळ शिकण्याचे, प्रश्न विचारण्याचे, उत्तरे शोधण्याचे, बोलण्याचे वाद-संवाद करण्याचे - शिकण्याचे स्वातंत्र्य.

ही कल्पनाच एवढी मुक्त आहे आणि आपल्याला मुक्ततेची भीती वाटते. आजही शिक्षण व समाजाने आपल्या स्वत:च्या भोवती आपल्याला मर्यादांचा - नितीमत्तेच्या अवास्तव कल्पनांचा -भयमिश्रीत - विश्वास दर्शविणाऱ्या सामाजिक संबंधांचा अेक पिंजरा बनवायला शिकवलय. या पिंजऱ्यामध्ये जो घरात पाळलेल्या पोपटासारखा उत्तम जगून मरून जाईल, त्याला मरेपर्यंत समाजाकडून प्रेम, माया, सन्मान, खाणे-पिणे सर्व मिळते, समाजाची त्याच्याकडे पाहून करमणुकही होते. हेच अंगवळणी पडल्याने स्वायत्त शैक्षणिक संस्थांच्या नुसत्या घोषणेनेही अनेक बुजुर्ग शिक्षणतज्ज्ञ तसेच 'याच' अनुभवातून द्रुोणाचार्य झालेले अनेकजण हादरले आणि पुन्हा एकदा त्यांनी अविश्वासाचा राग गायला सुरुवात केली. पुन्हा एका नव्या पिंजऱ्याच्या दांड्या उभारायला - कुठलाही नव्या बदलाचे स्वागत करण्याचा किमान अनुभवून पाहण्याचा संस्कार न झालेल्या मध्यम चाकरमानी व पालकांनाही भाग पाडलं गेलं. 'काहीही करू नका - प्रयोग तर अजिबात नको. जुन्या काळात आम्ही गायऽका शिकलो... आमचं काय वाईट झालं?' असं म्हणून या बदलांनाही ठामपणे पालक विरोध करू लागले.

समाजाची गती कुठे - 'स्व' या संकल्पनेचा विकास इतका झपाट्याने होत आहे की स्वयंसेवकचा आजचा अर्थ बदलून काही दिवसांनी तो 'स्वयंम्' साठी 'सेवक' ऐवढाच

होऊ शकेल. सर्व समाजातील विघटनाच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. 'एकत्र कुटुंब पद्धती' होती इतकेच म्हणायला लागतंय. अगदी शालेय पाठ्यपुस्तकातही 'मोठ कुटुंब' म्हणजे आई वडील व तीन किंवा तीन पेक्षा जास्त मुले असे शिकवले जाते. एकूणच निर्णयाचे स्वातंत्र्य, आर्थिक उभारणी व खर्चाचे स्वातंत्र्य. या स्वतंत्र्याच्या कल्पनेतच 'विकास' आहे अशी दृढ श्रद्धा निर्माण होत आहे. म्हणूनच संस्था जीवनावर या बदलत्या विचारांचा परिणाम होणारच. त्याच न्यायाने आज शैक्षणिक संस्थाही आर्थिक स्वातंत्र्य, निर्णय स्वातंत्र्य.... या अपेक्षांनी स्वायत्ततेकडे पहात आहेत. म्हणूनच 'उद्योग' म्हणून शिक्षणाकडे पहाणाऱ्या शिक्षण सम्राटानी तर 'स्वायत्तता' म्हणजे 'शिक्षणेच्छु' मध्यमवर्गीय व प्रतिष्ठेच्छु उच्च 'मध्यमवर्गीयांना' राजरोसपणे, प्रतिष्ठित मार्गाने - अजिबात घासाघीस न करता भरपूर मोठ्या रकमेला लुटावयाचा राजमार्ग अशीच याची व्याख्या केली असावी.

याच भीतीने आज 'स्वायत्तते'च्या मूळ संकल्पनेचा विचारही न होता याबद्दलचा एक भितीदायक स्वरुपाचा गैरसमज सर्वसामान्य जनतेत पसरत आहे. खरंतर स्वायत्तता ही स्वतंत्र मनाच्या स्वतंत्र विचाराच्या व स्वतंत्र संकल्पनांच्या मनुष्यनिर्मितीच्या सृजनशील अभिव्यक्तीचे माध्यम आहे. स्वनियंत्रित स्वातंत्र्य आहे.

सरळ, सोप्या भाषेत 'स्वायत्तता' म्हणजे 'जो जे वांछिल तो ते लाहो ।' या स्वरुपाचे प्रगटीकरण. कोकणातील भात शेती, आंब्याची पैदास, काजूचे पीक सोडून शहरातील बँकेत कारकुनी करणाऱ्या 'चाकरमाने' या विकृतीकरणाचे उत्तर आहे. गावातील काळीभोर जमीन सोडून तेथे पाण्याची व्यवस्था लावायची सोडून शहरातील माणसाला नळातून पाणी पोहोचवण्यासाठी खड्डे खणण्याचे काम करून हातावर पोट भरणाऱ्या 'मजूर' या जमातीचे भवितव्य आहे. 'शेतकरी राजा' म्हणवून घेण्यापेक्षा शहरात भीक मागून पैसे जास्त मिळतात या भावनेने आपला आत्मसन्मान मारणाऱ्या मनुष्यप्राण्याचे चरित्र आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील 'स्वातंत्र्ययज्ञ' धगधगत ठेवणाऱ्या शिक्षकांची परंपरा आजही जिवंत आहे. आज स्वातंत्र्यासाठी नाही तर सुतंत्रासाठी शिकवायचयं हे स्फुल्लींग जागृत होऊ देत मग त्यातून अनेक प्रश्नांची उत्तरे मिळायला सुरुवात होईल.

भारताला खेडोपाडी अनेक डॉक्टरांची आजही गरज आहे. भारतात गोवोगावी, बंधारे बांधून पाणी अडविण्यासाठी, पावसाळ्यात नदी नाल्यांवरून पूल बांधण्यासाठी अभियंते हवे आहेत. कॉम्प्युटर इंजिनिअरच्या बरोबरीने गावोगावी उत्तम शिक्षक हवे आहेत. स्थानिक उत्पन्नावर प्रक्रिया करणारे उद्योजक हवे आहेत. परदेशी जाणाऱ्या बुद्धीमंताइतकेच बुद्धीमंत शहराची वेस पार करून खेडोपाडी जाऊन रहायला हवेत... तुम्ही म्हणाल, 'ही उलटी गंगा कोण करणार....? हे काम स्वतंत्र व स्वायत्त शिक्षण करू शकतो.

स्वायत्त शिक्षण संस्थांना, शिक्षण तंज्ज्ञांना यातून एक आव्हान असेल ते आपल्या जवळची साधनसामुग्री परिसरातील नैसर्गिक संपत्ती वापरून स्वत:च्या पायावर समर्थपणे आजच्या तरुणाला उभे करण्याचे.

**'ब्लू प्रिंट' :-**

याचे 'ब्लू प्रिंट' कल्पनाशक्तीने रंगीबेरंगी बनविता येईल. पण स्वायत्त शिक्षणसंस्थेत हे अपेक्षितच नाही. कुठलीही ब्लू प्रिंट नाही सहजपणे उमलत जाईल ते शिक्षण, तो विषय - आवडीच्या विषयात अधिकाधिक शिक्षण अगदी आपल्याला 'केस कापण्याच्या' कलेतही प्राविण्य मिळवता येईल व समाजातही तेवढीच प्रतिष्ठा मिळेल कारण आपल्या काम करण्यावर आधारित आपली प्रतिष्ठा राहील - काय करताय यावर राहणार नाही.

वेगवेगळ्या पद्धतीने जगाचे दर्शन - आवडीच्या विषयांची अधिक माहिती - त्या विषयांचे नेमके अधिक प्रशिक्षण हे घेताना आपण चांगला माणूस व्हावे म्हणून मदत अशा ढाचा मध्ये परीक्षा आहे का नाही? हा प्रश्न गौण आहे. मग शिकतोय हे कळणार कसं? हे तुम्हाला अनुभवता येईल.

- ❒ आपण स्वत:लाच विचारू की मी घेतलेल्या शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाचा मला आज माझ्या व्यवसायात प्रत्यक्ष उपयोग किती होत आहे ?
- ❒ आपण आज जे काही काम आपल्या व्यवसायात अथवा नोकरीत करता याचे शिक्षण आपल्याला कुठे मिळाले?
- ❒ आपण आपल्या व्यावसायिक अथवा कामातील यशामध्ये सर्वात जास्त श्रेय कोणाला देऊ इच्छिता?
- ❒ आपल्या वर्गाच्या चार भिंतीमध्ये पाठ्यपुस्तकातील धडे, कविता, गणित, विज्ञान शिकवलेले शिक्षक आपल्याला आठवतात की त्यापुढे जाऊन 'गोष्टी सांगणारे', 'काहीतरी वेगळे सांगणारे' शिक्षक आठवतात.
- ❒ आपल्या महाविद्यालयातील 'क्लास रूम' टिचिंग सोबत इतर कॉलेजच्या आवारातील शिक्षण आपल्याला व्यवहारात किती उपयोगी पडले ?

**स्वायत्त शिक्षणसंस्थांना मोठा धोका 'भ्रष्टाचाराचा' कदाचित या अगोदरच्या सर्व गोष्टी पटतात पण....**

स्वायत्त संस्थातील प्रवेश प्रक्रिया, परीक्षा, शिक्षण, सुविधा यावर सरकारचे लक्ष नसेल तर 'शिक्षण' या विषयात लुटणाऱ्या संस्था उभ्या राहतील ही भीती मात्र साधार आहे. विनाअनुदानित या काहीशा स्वायत्ततेकडे जाणाऱ्या संस्थांनी अशा प्रकारचा इतिहास घडविला आहे. किंबहुना यामध्ये पैसा-भांडवल गुंतवणाऱ्यांनी फायद्याचाच विचार अधिक केला आहे. आपल्या भारतातील आजच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये बहुदा पैसा गुंतवण्याचा उद्देश त्यातून अधिक पैसा मिळवणे असाच राहील - आजच्या 'मार्केटिंग'च्या जमान्यात तो कोणाला गैरही वाटणार नाही.

कदाचित हे परिवर्तन होत असताना भ्रष्टाचारी प्रवृत्ती त्याचा फायदाही घेतील - परंतु गुणवत्तेवर आधारित नसलेली कुठलीही शिक्षणसंस्था फार काळ 'शोषणा'च्या स्वरुपात चालू शकणार नाही.

शिक्षण विशेषत: उच्च शिक्षण व 'व्यवसाय शिक्षण' हे महाग झाले तर तशाच स्वरुपाच्या पगाराची त्यांची अपेक्षा राहील. मग समाजातून बुद्धिमान तरुणांना घेऊन प्रशिक्षित करून आपापल्या उद्योगात कामाला लावण्याची पद्धती वाढेल. शिक्षण हे मूलभूत किंवा अप्लाइड स्वरुपातील विज्ञान तंत्रज्ञान संशोधन तसेच कला व वाणिज्य या शाखांसोबत व्यवस्थापन, क्रीडा, उपयोजित कला, सेवा माध्यम, मिडिया अशा अनेक शाखातून उपलब्ध होईल. ज्याला खरोखरच शिकायचय तो शिकेल व ज्याला दोन-चार वर्षे गंमत म्हणून कॉलेज लाइफ करायचं आहे, असा विद्यार्थी सहसा आढळणार नाही. मग शिकवणाऱ्यांबरोबरच शिकणाऱ्यांचाही दर्जा अत्युत्तमच असेल.

दैवाने मानवाला 'सृजनशीलता' दिली आहे. ती शाप आहे का वरदान त्या व्यक्तीच्या शिक्षणावरून ठरते. म्हणूनच मुक्त मोकळ्या - स्वायत्त शिक्षणाची आवश्यकता आहे व त्यासाठी स्वायत्त शिक्षण संस्थाही !

**प्रा. विद्याधर आ. वालावलकर**
वि.प्र. मंडळ तंत्रनिकेतन
ठाणे.

# 'चिटीन : कचऱ्यापासून कल्पवृक्ष'

*'चिटीन' या बहुपयोगी पदार्थाची ही उद्बोधक माहिती - संपादक*

मांसाहारी लोकांचे मासे हे अतिशय आवडते खाद्य. त्यातही कोलंबी किंवा खेकड्याचे कालवण जेवणामध्ये असेल तर मात्र विचारायलाच नको. कधी एकदा त्यावर तुटून पडतोय आणि त्याचा फडशा पाडतोय असे होऊन जाते. आपण सगळेच जण कोलंबी व खेकडे खाऊन झाल्यावर त्यांची साले मात्र फेकून देतो. बरोबरच आहे, सगळे फस्त केल्यावर त्या सालांचे ते काय करायचे? तुम्ही म्हणाल की, आता काय आम्ही साले पण खायची? बिल्कुल नाही. पण तुम्हाला माहीत आहे का? या कोलंबीच्या सालांमध्ये व खेकड्यांच्या कवचामध्ये 'चिटीन' (CHITIN) नावाचा एक पदार्थ मिळतो. 'चिटीन ? काय आहे हे चिटीन?' असा प्रश्न अगदी स्वाभाविक आहे.

चिटीन हा एक कापसासमान नैसर्गिक पदार्थ आहे. जो कोलंबी, खेकडे इत्यादी जातीच्या प्राण्यांच्या बाह्य आवरणापासून प्राप्त होतो. नैसर्गिकरित्या मिळणाऱ्या तंतुमय पदार्थांमध्ये कापसानंतर (Cellulose) चिटीनचा दुसरा क्रमांक लागतो. चिटीनचे रासायनिकरित्या इतर पदार्थांमध्ये रूपांतर करता येते. अशाप्रकारे बनविलेले 'चिटोसन' (CHITOSAN) व ग्लुकोसामाइन (GLUCOSAMINE) आज प्रत्येक औद्योगिक क्षेत्रात वापरले जाऊ शकते. आज एकही क्षेत्र असे नाही जेथे चिटीनचा उपयोग होत नाही म्हणून आम्ही त्याला कल्पवृक्षाची उपमा देतो.

चिटोसन हे एक अतिशय प्रभावी खराब पाणी स्वच्छ करण्याचे माध्यम आहे. संशोधनाअंती हे सिद्ध झाले आहे की पाणी स्वच्छ करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तुरटीच्या कितीतरी पटीने अधिक कार्यक्षमता चिटोसन दाखविते. पिण्याच्या पाण्यातील अनावश्यक धातू काढण्यासाठी, औद्योगिक खराब पाणी स्वच्छ करण्यासाठी तसेच फळांच्या रसातील अनावश्यक पदार्थ दूर करण्यासाठी चिटोसनचा उपयोग केला जातो. औषध निर्माण क्षेत्रात (Pharmaceutical Industry) चिटीनचा उपयोग बऱ्याच ठिकाणी केला जातो. सौंदर्य प्रसाधने बनविण्यासाठी, कृत्रिम अवयव बनविण्यासाठी, विशिष्ट काळाने कार्यान्वित होणारी औषधे बनविण्यासाठी, जखम लवकर बरे होण्याची विशिष्ट पावडर बनविण्यासाठी, त्याचप्रमाणे संधिवातावरील प्रभावी औषध बनविण्यासाठी प्रामुख्याने याचा वापर केला जातो. फळे व भाजीपाला ताजा रहावा यासाठी चिटोसनच्या बाह्य आवरणाचा उपयोग केला जातो. जपानमध्ये यापासून कागद निर्मिती केली जाते. वस्त्रोद्योगामध्ये चिटोसनचा उपयोग कपड्यांना कायमस्वरूपी रंग प्रदान करण्यासाठी केला जातो. काचेवर रंगकाम करण्यासाठी देखील चिटोसनचा उपयोग करतात. रंगोद्योगामध्ये विविध प्रकारचे व पक्के रंग बनविण्यासाठी चिटोसन वापरले जाते. तसेच बांधकाम क्षेत्रामध्ये सिमेंटला मजबूती देण्यासाठी चिटोसन वापरले जाते.

चिटीनचे एवढे विविधांगी उपयोग असूनही भारतीय जनमानसामध्ये याचे महत्त्व फारच थोड्या लोकांना माहीत आहेत. आज भारतामध्ये फारच थोडे कारखाने आहेत जे चिटीन व चिटोसन बनवितात. यातील बहुतांश भाग, अंदाजे ९०%, पाश्चात्त्य देश जसे की, अमेरिका, इंग्लंड, इटली, फ्रान्स, जपान इ. ठिकाणी निर्यात केला जातो. तसेच बऱ्याच क्षेत्रांमध्ये पाश्चात्यांनी चिटीन वापरायला सुरुवातही केली आहे.

म्हणून पुढील वेळी कोलंबी किंवा खेकड्याचे कालवण खाताना आपण चिटीनचाही विचार कराल याची खात्री आहे.

**वरद रविंद्र प्रधान**
४०८, तेली हाऊस,
खारकर आळी, ठाणे - १.
फोन नं. : २५४३ ४२३४

# ।। इथे (अ) मराठीचिये नगरी ।।

*या महिन्यातील शिरवाडकरांच्या जयंतीचा दिवस 'मराठी दिन' म्हणनू साजरा केला जाईल. त्यानिमित्ताने मराठीचे मराठीतून केलेले प्रकट चिंतन - संपादक*

२७ फेब्रुवारी. मराठी भाषेतील ऋषितुल्य सारस्वत कै. कुसुमाग्रज तथा विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्म दिन. हा दिन 'जागतिक मराठी भाषा' दिन म्हणून पाळला जातो. ज्ञानभाषा संस्कृतची सर्वांत जवळची बहीण समजल्या जाणाऱ्या मराठीवर आज 'दिन' साजरा करण्याची 'दीन' पाळी यावी, हे जळजळीत सत्य आहे. मराठी भाषेच्या दशेचा आणि दिशेचा हा उहापोह -

मराठी भाषेचा उगम हा थेट इ. स. १००० च्या आसपासच्या काळात सापडतो. 'चावुंडराये करवियले' हे मराठीतील पहिले ज्ञात वाक्य होय. त्यानंतर मराठीचा विकास सुरू झाला. परंतु मराठी भाषेला खऱ्या अर्थाने प्रतिष्ठा मिळवून देण्यास ज्ञानेश्वर विठ्ठल कुलकर्णी नामक एक किशोर कारणीभूत ठरला. ज्ञानोबा माऊलींच्या ज्ञानेश्वरी सारख्या एका अलौकिक निर्मितीमुळे अवघ्या विश्वाचं गूढ तत्वज्ञान प्रथमच मराठी भाषेत उलगडले गेले. संस्कृत भाषेमध्ये आधी विपुल ज्ञान निर्मिती झाली होती, होतही होती. परंतु तात्कालिन समाजाची गरज ओळखून संत ज्ञानेश्वरांनी भावार्थ दिपिके सारखी ज्ञानाची अलोट भागिरथी मराठीत वाहून आणली आणि क्रांती घडवली. या समृद्ध पार्श्वभूमीवर पुढे संत एकनाथ, मराठीची ओळख पंजाबात सांगणारे नामदेव महाराज, चोखामेळा, ज्ञानयोगी, कर्मयोगी समर्थ रामदास, जगद्‌गुरू तुकाराम महाराज अशी अलौकिक ज्ञानपरंपरा मराठीत निर्माण झाली. शिवछत्रपतींचा खंबीर राजाश्रय मिळाल्याने मराठीची ही घौडदौड पुढे चालूच राहिली. संत, तंत, पंत कवींच्या या परंपरेत पेशव्यानी शाहिरी वाङ्मयाला प्रोत्साहन दिल्याने मराठी लोकभाषा खऱ्या अर्थाने बहरली.

नंतरच्या काळातही मराठी भाषेने, साहित्याने, वाङ्मयाने अनेक प्रवाहांना सामील करून घेऊन मार्गक्रमणा केली. अलीकडच्या काळात मराठी साहित्यावर, भाषेवर अनेक विचारसारणींचा, प्रवाहांचा प्रभाव पडला. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, केशवसुत, गडकरी यांच्यापासून ते थेट पु. ल. देशपांडे, अत्रे, वि.वा.शिरवाडकरांपर्यंत ही परंपरा समृद्ध झाली आणि ती आजही अबाधित आहे. या प्रवासादरम्यान मराठी भाषेच्या स्वरुपामध्ये, बोलीभाषेमध्ये, उच्चारणामध्ये अनेक बदल घडून आले. बदल्या काळातमध्ये मराठी व्याकरणाच्या नियमांमध्येही अनेक बदल झाले व ते स्वीकारले गेले. एवढा सगळा पाढा वाचल्यानंतरही सद्य स्थितीत मात्र मराठी भाषेच्या अस्तित्वाविषयीच प्रश्न का निर्माण केला जातोय? या प्रश्नाचं उत्तर शोधताना अनेक मुद्यांचा, परिस्थितीचा साकल्याने परामर्श घेणं आवश्यक ठरतं.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले आणि 'मराठी'ला राजभाषा म्हणून अधिकृत राजमान्यता मिळाली. परंतु तेव्हापासूनच कर्नाटकातील मराठी भाषिक प्रदेशावर झालेला अन्याय आणि गोव्यातील कोकणी-मराठी वाद उफाळून आल्याने मराठी भाषेच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला. यामागेही अनेक मत-मतांतरे होती. कर्नाटक सारख्या इतर दाक्षिणात्य राज्यांनी प्रादेशिक भाषेची कास कधीही सोडली नाही. आजही दाक्षिणात्य राज्यांत भ्रमण करताना भाषेची अडचण ही प्रकर्षाने जाणवते. बाह्यसंपर्कासाठी बहुतांश दाक्षिणात्य राज्यांनी इंग्रजीचा अतिशय प्रभुत्वाने वापर केला. परंतु इतर भाषांना मात्र आपल्या स्थानिक पातळीवर कधीच थारा दिला नाही. या उलट महाराष्ट्रात मात्र राष्ट्रभाषेचा वापर हा कटाक्षाने अवलंबण्यात आला. विशेष करून मुंबईसारख्या महाराष्ट्राच्या राजधानीतून मराठी भाषा आणि मराठी माणूस हद्दपार होणार की काय अशीही परिस्थिती निर्माण झाली. किंबहुना याच सबबीवर नजिकच्या काळात मुंबई महाराष्ट्रापासून विलग होऊन केंद्र शासित प्रदेश होण्याचा

धोका नाकारता येणार नाही. मुंबईमध्ये विविध भाषिक लोकवस्ती ही अगदी बऱ्याच काळापासून निवास करून आहे. त्याबरोबर देशातील परप्रांतीयांचे लोंढे सामावून घेताना या नगरीत उद्भवलेल्या अनेक समस्यांमध्ये या 'भाषिक' समस्येची भर पडली आहे. मुंबईत जगायचं असेल तर मराठी पेक्षा 'हिंदी येणं हे अग्रक्रमाने अवलंबिलं जाते. हेच कटु सत्य आहे. अर्थात उर्वरित महाराष्ट्रात हीच परिस्थिती आहे असं नाही. परंतु मुंबई-पुण्याचे पडसाद हे संबंध महाराष्ट्रभर उमटतात हाच आजवरचा अनुभव आहे.

साहित्य, संस्कृती, कला, विविध कलाप्रकार हे आपले आविष्करण एका विशिष्ट भाषासंकेतांच्या माध्यमातूनच करीत असतात. या कलाविष्कारामंध्ये नाट्य, नृत्य, संगीत, चित्रपट अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. दादासाहेब फाळके, भालजी पेंढारकर, व्ही. शांताराम यासारख्यांचा बारसा सांगणारा मराठी चित्रपट आज 'चित्पट' झाल्यातच जमा आहे. एकीकडे मुंबईतच ऐश्वर्याचा काळ उपभोगणारी हिंदी चित्रपटसृष्टी तर दुसरीकडे देवदासाच्या अवस्थेत पोहोचलेली मराठी चित्रपटसृष्टी हा विरोधाभास दृष्टीआड करता येत नाही. मराठी माणसाच्या आणि भाषेच्या सुदैवाने मराठी नाट्यसृष्टीच काय ती बऱ्यापैकी तग धरून आहे. अर्थात रंगभूमीवरचा सकस संहितांचा दुष्काळ हा दुर्लक्ष करण्याजोगाही नक्कीच नाही.

भाषा ही दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संवादाचे, संपर्काचे एक मूलभूत माध्यम मानले जाते. आज दोन मराठी माणसे एकमेकास भेटली असता मराठीतून बोलणे टाळतात ही सत्य परिस्थिती आहे. आज शिक्षणासारख्या क्षेत्रातही इंग्रजी माध्यमाचे वाढते प्राबल्य हे लक्षणीय आहे. अर्थात यात पालक, विद्यार्थी यांचा दोष आहे असेही नाही. आज तेही शेवटी परिस्थितीचे बांधील आहेत. इंग्रजी ही उद्याच्या जगाची भाषा आहे हेही तितकचं खरं आहे. पण म्हणून इंग्रजी माध्यमधिष्ठित विद्यार्थ्यांनी मराठी बोलणं, वाचणं हे त्याज करावे हे नक्कीच समर्थनीय नाही. मराठी भाषेचा भविष्यकाल उज्ज्वल व्हावयाचा असेल तर 'ज्ञानभाषा' मराठी 'विज्ञानभाषा' कशी होईल, याला प्राधान्य देण्याची गरज आहे. आज मराठीत विज्ञानधिष्ठित लिखाणाची, वैज्ञानिक विषयांना वाहिलेल्या प्रकाशनांची वानवा आहे हेही तितकचं खरं आहे. नुसत्या इंग्रजीतून नव्हे तर जगातील इतर भाषांमध्येही होणाऱ्या संशोधन कार्याची माहिती वाचकाला मराठीतून उपलब्ध व्हावयास हवी. मराठी भाषिक संशोधकांनी आपल्या संशोधन कार्यांची माहिती वाचकाला मराठीतून उपलब्ध करावयास हवी. मराठी भाषिक संशोधकांनी आपले संशोधन कार्य इंग्रजीबरोबरच मराठीतही प्रकाशित करण्यास प्राधान्य द्यावे. आज विकसित देशांमध्ये कार्यरत असणाऱ्या संगणक तज्ज्ञांमध्ये मराठी जनांची संख्या लक्षणीय आहे. अशा तंत्रज्ञांनी संगणक सॉफ्टवेअर प्रणाली या मराठीत विकसित करून मराठी माणसास संगणक तंत्र अधिक सुकर कसे होईल, याकडे भर द्यावयास हवा. त्याचबरोबर मराठी भाषेतील ज्ञान व विज्ञान हे जागतिक स्तरावर कसे जाईल, याचाही विचार व्हावयास हवा. मराठी भाषेमध्ये ज्ञानोबा-तुकोबा-रामदासांसारख्या संत साहित्यात अनेक ठिकाणी वैज्ञानिक तत्वे, सूत्रे विखुरलेली आढळतात. त्यांचा योग्य तो अभ्यास व्हावयास हवा. आज जर्मनीसारख्या देशांनी संस्कृतातील वैज्ञानिक ज्ञानाची अलोट संपत्ती तिकडे नेऊन त्यावर संशोधन केले आहे. परंतु इकडे मात्र पुरोगामित्वाच्या अतिरेकामुळे 'केवळ ह्यात काय आणि त्यात काय' असे अनाठायी दृष्टीकोन बाळगले गेले. त्यामुळे समाजाचा, संस्कृतीचा व पर्यायाने भाषेचा ऱ्हास झाला. आज साहित्याच्या संमेलनांवर वारेमाप उधळपट्टी करण्यापेक्षा मराठी विश्वकोशाचे कार्य तडीस न्यावयास हवे. मराठीत विज्ञानकोश, तंत्रज्ञान कोश यासारख्या संकल्पनांची आवश्यकता आहे.

ज्ञान-विज्ञान, समता, वैश्विक बंधुभाव या पाश्चात्य संस्कृती कडून तथाकथित आयात संकल्पनांचे 'जागतिकीकरण' हे ज्ञानोबांनी पसायदानाच्या रूपात ७५० वर्षांपूर्वीच केले आहे. फक्त मराठी भाषेचे जागतिकीकरण झाल्यास या भाषेच्या अस्तित्वाचा प्रश्न उरणारच नाही हे मात्र नक्की!

- अमेय रानडे
amyaranade@yahoo.co.in

# परिसर वार्ता

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र मंडळातर्फे १५ ते ३१ जानेवारी दरम्यान झालेल्या पेट्रोलियम संवर्धन पंधरवड्यानिमित्त इंधन बचत या विषयावर एका महत्त्वपूर्ण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. तंत्रनिकेतनाच्या दृक् श्राव्य कक्षात झालेल्या या कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा मिळालेला प्रतिसाद व विषयाचे महत्व लक्षात घेता कार्यशाळेचा कार्यक्रम दोन सत्रात घेतला गेला. यातील एक सत्र तृतीय वर्ष केमिकल टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांसाठी होते.

कार्यक्रमाची सुरुवात रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. स. ग. मेहेकर यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. इंधन कसे वाचवावे, लहान-सहान बाबी इंधन बचतीत कशा महत्त्वपूर्ण ठरू शकतात, याबाबत इंडियन ऑईल कॉर्पोरेशनच्या उपप्रबंधक (एल.पी.जी.सेल्स) श्रीमती नीता वाळींजकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. घरगुती इंधन बचती संदर्भात उपयुक्त ठरतील, अशा अनेक सूचना त्यांनी केल्या. दृक् श्राव्य माध्यमाच्या वापरामुळे हा विषय विद्यार्थ्यांना अधिक सुलभ करून प्रक्षेपित केला गेला.

घरगुती वापराप्रमाणेच वाहनांसाठी लागणारे इंधन कसे वापरावे, त्याची बचत कशी करावी, याबाबतचे मौलिक मार्गदर्शन पेट्रोलियम कन्झर्वेशन असोसिएशनचे साहाय्यक प्रबंधक श्री. ए. के. मित्तल व श्री. चेतन खोडवे यांनी केले. या संबंधातील माहिती व सूचनांचा प्रसार व्हावा, या दृष्टीने विद्यार्थ्यांना माहितीपत्रके देण्यात आली. विद्यार्थ्यांनी भरून दिलेल्या प्रश्नावलीत इंधन बचतीवर एक घोषवाक्यही सुचविण्यास सांगण्यात आले होते. उत्कृष्ट घोष वाक्यांना पारितोषिके देण्यात आली.




श्री. चेतन खोडवे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील व प्रा. स.ग. मेहेकर यांचे मार्गदर्शन लाभले होते. रसायन शास्त्र विभागातील ज्येष्ठ प्रा. व्ही. एस. बुरकुले यांनी कार्यक्रम आयोजनासाठी विशेष प्रयत्न केले. दृक् श्राव्य कक्ष उपलब्ध करून देऊन तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सौ. श्री. मुजुमदार व उपप्राचार्य डी. के. नायक यांनीही रसायन शास्त्र मंडळास मोलाचे सहकार्य केले. याशिवाय रसायन शास्त्र विभागातील सहकारी प्रा. सौ. कर्णिक, प्रा. मीरा अकोलकर, डॉ. अतुल बेडेकर यांचे व शिक्षकेतर कर्मचारी श्री. एम. पी. हरड (रसायन शास्त्र विभाग) व श्री. भरत लहानगे (ग्रंथालय) यांचेही मोलाचे सहकार्य कार्यक्रम यशस्वी करण्यास मिळाले.

### नॅकसंबंधी ग्रंथपाल कार्यशाळा

केळकर-वझे महाविद्यालयाने आयोजित केलेल्या ग्रंथपालांच्या कार्यशाळेस कला-वाणिज्य महाविद्यालयाच्या साहाय्यक ग्रंथपाल सौ. पाटील व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे मी स्वत: उपस्थित होतो. या कार्यशाळेच्या दुपारच्या सत्रात नॅक सदस्यांतर्फे कसे प्रश्न ग्रंथपालाला विचारले जाऊ शकतात, याचे प्रात्यक्षिक सादर करणाऱ्या अभिरूप मुलाखती सादर केल्या गेल्या. यात रुपारेलचे ग्रंथपाल प्रा. प्रदीप कर्णिक व माझी मुलाखत घेतली गेली. कार्यशाळेस सुमारे १२५-१५० ग्रंथपाल उपस्थित होते. प्राचार्य डी. एम्.आर. कुरूप यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.

प्रकाश करमरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यशाळेचे नेटके आयोजन केले होते.

### अवकाशात ३० लाखाच्यावर उल्का, लघुग्रह असल्याचा अंदाज

अवकाशात सुमारे ३० लाखाच्यावर उल्का, लघुग्रह आणि धुमकेतू असल्याचा अंदाज आहे. पृथ्वीच्या कक्षेजवळून फिरणाऱ्या उल्कांचा पृथ्वीला कायमचा धोका असून तो टाळण्यासाठी त्यांच्यावर नजर ठेवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन '२००२ एन. टी.' या लघुग्रहाचा शोध लावणारे तरुण खगोल अभ्यासक विष्णू वर्धन रेड्डी यांनी सांगितले.

ठाण्याच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्यांनी हे प्रतिपादन केले. विष्णू रेड्डी यांनी ४ जुलै २००२ रोजी अमेरिकेतील गुडरिक पीगॉय या वेधशाळेतून या नव्या लघुग्रहाता शोध लावण्यात यश मिळविले. अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनी त्यांनी हा शोध लावल्यामुळे त्यांचे त्या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून खूप कौतुक झाले. इंटरनॅशनल अॅस्ट्रॉलॉजिकल युनियन या संस्थेच्या मायनर प्लॅनेट सेंटरने त्यांच्या शोधावर शिक्कामोर्तब केले आहे.

'पृथ्वीच्या कक्षेजवळून फिरणारे सुमारे २८२ लघुग्रह असून त्यातील १२० लघुग्रहांपासून पृथ्वीला धोका संभवतो. गुरुत्वकर्षणांमुळे हे लघुग्रह पृथ्वीवर आदळू शकतात' असे नमूद करून रेड्डी यांनी सांगितले की, 'भारतात या खगोलशास्त्रीय ज्ञानाचे अधिक संशोधन करण्याची गरज आहे. त्यासाठी अभ्यासात गाडून घ्यावे लागेल.' अवकाशामध्ये १००० कि. मी. लांबीचा सर्वात मोठा लघुग्रह असावा, असा अंदाज आहे.

विष्णू रेड्डी 'एशियन एज' या इंग्रजी वृत्तपत्रात दिल्लीमध्ये मुख्य उपसंपादक म्हणून काम करतात. पत्रकारितेला रामराम ठोकून उल्का, लघुग्रह, धूमकेतू या विषयावर संशोधन करणार आहेत.

या प्रसंगी प्रा. सी. जी. पाटील. उपप्राचार्या माधुरी पेजावर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

### डॉ. सारंगांना निरोप

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील रसायन शास्त्राचे मावळते विभागप्रमुख डॉ. सी. म. सारंग यांच्या निरोपाप्रीत्यर्थ रसायन शास्त्र विभागात एक छोटेखानी समारंभ दिनांक ४ जानेवारी रोजी करण्यात आला. प्रा. प्रकाश बामणे यांनी सूत्र संचालन केले तर विभागातील प्रा. सौ. वर्षा महाजन, प्रा. विनायक बुरकुले, प्रा.सौ. कृष्णन, श्री. प्रकाश महाराव यांनी आपल्या भावना



*डॉ. सारंग यांचा सत्कार करताना नवे विभाग प्रमुख प्रा. स.ग.मेढेकर*

व्यक्त केल्या. रसायन शास्त्र विभागाचे नवे विभागप्रमुख म्हणून सुत्रे हाती घेणारे ज्येष्ठ प्रा. स. ग. मेढेकर यांनीही डॉ. सारंगाच्या सहवासातील आठवणींना उजाळा दिला. प्रा. सौ. मीरा अकोलकर यांनी ऋणनिर्देश केले.

या भावपूर्ण सत्कारामुळे व सहकाऱ्यांच्या प्रेमामुळे आपण भारावून गेलो असल्याचे सांगून डॉ. सारंग यांनी सत्काराला उत्तर दिले. विभागातर्फे भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे छायाचित्रण व फोटोग्राफी प्रा. विनायक बुरकुले यांनी केली.

प्रा. मोहन पाठक